महाराष्ट्रकाव्यमकरंद.

शिवराम सीताराम वागळे.

किंमत पांच आणे.

महाराष्ट्रकाव्यमकरंद.

संग्राहक

शिवराम सीताराम वागळे, बी. ए. एल. एल. बी.

मुंबईत

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिलें.

इ० स० १८९६.

किंमत पांच आणे.

प्रस्तावना.

प्राचीन महाराष्ट्र कवींचे ग्रंथ मी करमणुकीकरतां वाचीत असतां त्यांच्या पुष्कळ उक्ति मला स्मरणीय वाटल्या. ह्या उक्ति ह्मणजे व्यावहारिक ज्ञान व अनुभव यांचे कोठेच होत. व त्या ह्मणीवजा असून बोलण्यांत किंवा लिहिण्यांत सहज गुंफून देतां येण्यासारख्या आहेत. इंग्लिश वक्त्यांच्या भाषणांत व गद्य लेखकांच्या लेखांत प्रसंगवशात् इंग्लिश कवींच्या उक्ती कशा गोवून दिलेल्या असतात व त्यांच्यामुळें भाषेला सौंदर्य, जोर व आटपशीरपणा हीं एकदम कशीं प्राप्त होतात हें तज्ज्ञांस ठाऊक आहे. तसाच प्रकार मराठी भाषेंत व्हावा, व तिला अलंकृत करण्याचें एक सुलभ साधन असावें, या हेतूनें प्रस्तुत पुस्तक त्या भाषेची अभिवृद्धि इच्छिणारांस सादर केलें आहे.

ह्या उक्तींपैकीं कांहीं प्रचारांत आहेत. पण प्रचारांत येण्यास योग्य असून आलेल्या नाहींत अशांची संख्या फार मोठी आहे.

हें पुस्तक प्रथमवाचनाचें फळ आहे. रत्नांच्या खाणींत शिरल्यावर जेवढ्या मण्यांची प्रभा सहज व अनायासें झळकली तेवढेच अगोदर वेंचून घेतले. हे जर रसिक व गुणज्ञ पारख्यांना पसंत पडले तर त्याच खाणींत पुनः प्रवेश करून व दुसऱ्या खाणीकडे वळून आणखी रत्नें हुडकून काढण्याचे श्रम करण्यास उमेद येईल.

शि. सी. वा.

महाराष्ट्रकाव्यमकरंद.

ज्ञानदेव.

ज्ञानेश्वरी; अध्याय १.

(१) मूळसिंचनें सहजें। शाखापल्लव संतोषती.

(२) नगरांतरीं वसिजे। तरी नागरीच होईजे.

(३) काय भानुतेजीं खद्योतां[1]। शोभा आंथी[2]?

अध्याय २.

(४) जेथींचिया कृपा लाहिजे वर। तेथेंचि मनें व्यभिचार।
तरी काय मी भस्मासुर?

(५) अमृतही विटे। कीं काळवशें वज्रही फुटे।
परी मनोधर्म न लोटे। विकरविला ही.

(६) सरितांतें सागरू। त्यजी केंवी?

(७) मातेच्या कोपीं थोंकलें[3]। स्नेह आथी.

(८) कीं औषधाचिया कडवटपणीं। जैसी अमृताची पुरवणी।
ते आहाच न दिसे परि गुणीं। प्रकट होय.

(९) वरिवरी पालवी खुडिजे। आणि मुळीं उदक घालिजे।
तरी कैसेनि नाश निपजे। तया वृक्षा?

(१०) जो अमृतातें ठिं[4] ठेवी। तो + कांजी न सेवो.

---

१ काजव्याला. २ आहे. ३ गुप्त. ४ नांव.

अध्याय ३.

(११) अमृतसिंधूतें ठाकावें। मग ताहानाचि जरी फुटावें
तरी सायास कां करावे। मागील ते?

(१२) मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरें[1] लावावें।
अलौकिक नोहावे। लोकांमती.

(१३) चंद्राचा उदय जैसा। उपयोगा नवचे वायसा।
मूर्खा विवेक हा तैसा। रुचेल ना.

(१४) पतंग काय साहाती। प्रकाशातें?

(१५) लोकांचीं धवलारें[2]। देखोनिया मनोहरें।
असती आपुलीं तणारें[3]। मोडावीं केवीं?

(१६) आणिकांसि जें विहित। आणि आपणपें या अनुचित।
तें नाचरावें तरी हित। विचारिजे.

(१७) (काम क्रोध) हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ।
भजन मार्गींचे मांग। मारक जे.
हे जळेंवीण बुडविती। आगीवीण जाळिती।
न बोलतां कवळिती। प्राणियांतें.

अध्याय ४.

(१८) खवणे[4] यांच्या गांवीं। पाटोवें[5] काय करावीं।
सांगें जात्यंधा रवी। काय आथी?
कां बहिरयाच्या आस्थानीं[6]। कवण गीतातें मानी।

---

१ मार्गाला. २ मंदिरें. ३ गवताचीं घरें. ४ दिगंबर दीक्षा धारण करणारे. ५ वस्त्रें. ६ सभेमध्यें.

कीं कोल्हे या चांदणीं । आवडी उपजे ?

(१९) चंद्रोदया आरौतें । जयांचे डोळे फुटती असते ।
ते कावळे केवीं चंद्रातें । वोळखती ?

(२०) धर्मासीं नीतीसीं । शेंस भरीं.

(२१) साच आणि लटिकें । विरुद्ध आणि निकें ।
संशयी तो नोळखे । हिताहित.
हा रात्री दिवस पाहीं । जैसा जात्यंधा ठाउवा नाहीं ।
तैसें संशयी असतां कांही । मना नये.

(२२) जरी मंत्रेंचि वैरी मरे । तरी वांया कां बांधावे कटारे ।
रोग जाय दुधें साखरें । तरी निंब कां पियावा ?

अध्याय ६.

(२३) प्राप्तीचिये वेळे । निदैवा आंधळेपणाचे डोहळे ।
कीं असते आपुले डोळे । आपण झांकी.

(२४)-न वचेल । अभ्यास वांया.

(२५) मन आपुला स्वभावो । सांडील काई ?

अध्याय ७.

(२६) आस्थेच्या महापुरीं । रिघताती कोटीवरी ।
परी प्राप्तीच्या पैलतीरीं । विपाइला[२] निघे.

(२७) जळींचीं जळीं न विरती । मुक्ताफळें.

---

१ आलीकडे, अगोदर. २ विरला.

अध्यायः ८.

(२८) मार्गामार्ग देखावे । साच लटिकें ओळखावें ।
हिताहित जाणावें । हिताचि लागीं.

अध्याय ९.

(२९) वक्ता तो वक्ता नोहे । श्रोतेनिविण.

(३०) दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदराआड ।
परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्धचि सेवी.

(३१) कमलकंदा आणि दर्दुरी । नांदणूक एकेचि घरीं ।
परि पराग सेविजे भ्रमरीं । येरा चिखलचि उरे.

(३२) दिठी वेधली कवळें । तें चांदणियातें ह्मणे पिवळें.

(३३) ज्वेंरें विटाळलें मुख । तें दुधातें ह्मणे कडू विख.

(३४) स्वर्गीचे नि अमृतें । अमर नोहिजे.

(३५) कोण्ही एक कांजी प्याला । मग परिणाम पाहों लागला ।
अमृताचा.

(३६) कां कोंडा कांडितां सुभटा । कण जोडे ?

(३७) तंवचि वहाळ वोहळ । जंव न पवती गंगाजळ ।
मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप.
कां खैरचंदनकाष्टें । हे विवंचना तंवचि घटे ।
जंव न घापती एकवटे । अग्निमाजी.

(३८) जंव जंव बाळ बळिया वाढे । तंव तंव भोजें नाचती कोंडे ।
आयुष्य निमालें आंतुलिये कडे। ते ग्लानाचि नाहीं.

अध्याय १०.

(३९) बीज आलिया मुठी । तरूचि आला होय.

अध्यायः ११.

(४०) भोग्य तें त्रिशुद्धी न चुके ।
आणि बुद्धिही होणारा सारिखी ठाके.

(४१) परिसाचा खडवाचि जोडला । कीं फोडूनि आह्मी गाडोरां
घातला । कल्पतरू तोडोनि केला । कूप शेता.

(४२) सख्याचें उद्धत । सखा साहे निवांत.

अध्याय १२.

(४३) अभ्यासाचेनि बळें। एकां गति अंतराळें ।
व्याघ्र सर्प भांजळे । केले एकीं ॥
विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे ।
एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें केलें ॥
ह्मणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं.

(४४) खडकीं जैसें वर्षलें । कां आगीमाजी पेरिलें.

(४५) घरींचिया उजियेड करावा । पारखियां आंधार पाडावा ।
हें नेणेंचि गा पांडवा । दीप जैसा ॥
जो खांडावया घाव घाली । कां लावणी जयानें केली ।
दोघां एकचि साउली । वृक्ष दे जैसा ॥
नातरी इक्षुदंडु । पाळि तया गोडु ।
गाळि तया कडु । नोहेचि जेवीं.

(४६) पाउसें विणें न सुके । समुद्र जैसा.

(४७) उत्तमासी मस्तक । खालविजे.

अध्याय १३.

(४८) भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव.

(४९) केळीं कापूर जाहाला। जेविं परिमळें जाणों आला ।
कां भिंगारीं दीप ठेविला । बाहेरि फांके.

(५०) घर मोडोनि केले । मांडव पुढें.

(५१)- आंग धुणें । कुंजराचें.

(५२) बैल विकूनि गोठा। पुंस लावोनि बांधिजे गांठा.

(५३) मुंगिये मेरु नोलांडवे । मशका सिंधु न तरवे.

(५४) जें भुंई बीज खोंविलें । तेंचि वरी रुख जाहालें ।
तैसे इंद्रियद्वारां फांकलें । तें अंतरचि कीं.

(५५) आवडे ते वृत्ति किरीटी । आधीं मनौनीचि उठी ।
मग ते वाचे दिठी । करांसि ये ॥
वांचूनि मनींचि नाहीं । तें वाचेसि उमटेल काई ।
बीजेंवीण भुंई । अंकुर असे ?

(५६) समुद्रीं दाटें भरितें । तें समुद्रचि भरी तऱ्यांतें.

(५७) पंडित धरूनि बाळाचा हात । वोळी लिही सुव्यक्त ।
आपणची.

(५८) रत्न पारखियाच्या गांवीं । जाईल गंडकी तरी सोडावी ।
काश्मीरीं न करावी । मिडगण तेथें.

(५९) अंतर शुद्ध नसतां । बाहेरि कर्म तों सर्वथा ।
विटंबु गा.

(६०) मृत जैसा शृंगारिला । गाढव तीर्थीं न्हाणिला ।
कडु दुधिया माखिला । गुळें जैसा ॥
वोस गृहीं तोरण बांधिलें । कां उपवासीं अन्नें लिंपलें ।
कुंकुम सेंदुर केलें । कांतहीनेतें ॥
कलश ढिमाचे पोकळ । जळो वरील ते झळाळ ।
काय करूं चित्रींव फळ । आंत शेण.

(६१) पाणिये हिरा न भिजे । आधणीं हरळ न शिजे ।
तैसी विकल्पजातीं न लिंपिजे । मनोवृत्ती.

(६२) नव्हती भोग सतियेचे । प्रेमभोग.

(६३) लोभिया दूर जाये । परि जीव ठेवाठाये.

(६४) जाहाला अग्नी तरी राखोंडी । जाळील काई ?

(६५) आंधळेया हातीं दिवा । देऊनि काय करावा ?

(६६) कृतघ्ना उपकार केला । कां चोरा व्यवहार दिधला ।
निसुग स्तविला । विसरे जैसा.

(६७) बेडूक सापाचिया तोंडीं । जातसे सुबुड बुडीं ।
तो मक्षिकाचिया कोडीं । स्मेरना कांहीं.

(६८) तारुण्य आजिचें । भोगितां वृद्धाप्य पौंहचे.

(६९) अंवतिलें[1] आंधळें । तें दुजेनसीं ये.

अध्याय १४.

(७०) विद्वत्तेचें भरे । भूत अंगीं.

---

१ बोलविलें.

(७१) काय जळार्णव पाउसें । साजा होय?

(७२) निद्रिताचेनि आंगेंसि । साप तैसी उर्वशी.

अध्यायः १५.

(७३) पाताळिंचेंही निधान । दावील कीर अंजन ।
परि होआवे लोचन । पायाळाचे.

(७४) दानशील पुरुष । वंचकपणेंचि संचक.

(७५) अपमानिला अतिथि । ने सुकृताची संपत्ती.

(७६) बांधोनियां डोळे । घ्राणीं लाविजती मुक्ताफळें ।
तरी तयांचें काय कळे । मोल मान.

(७७) स्वातीचें उदक । शुक्तीं मोतीं, व्यालीं विख.

(७८) वन्हि काष्ट जाळूनियां । स्वयें जळे.

(७९) सेवंतीये अरसिकांहीं । आंग पाहतां विशेष नाहीं ।
परी सौरभ्य नेलें तिहीं । भ्रमरीं जाणिजे.

अध्याय १६.

(८०) पुजूनि देव पाहिजे । पेरूनि शेता जाईजे ।
तोषौनि प्रसाद घेईजे । अतिथीचा.

(८१) आंगें बुडतां महापुरीं । जे वेगें काढी पैलतीरीं ।
ते नावचि बांधिलिया शिरीं । बुडवी ॥
कारण जें जीविता । तें वानिलें जरि सेवितां ।
तरि अन्नचि पंडुसुता । होय विष.

(८२) वाचेचा चौबारा । घातलिया धर्माचा पसारा ।
धर्मचि तो अधर्म होय वीरा । तो दंभ जाणें.

(८३) माडुरी लोकांचा घोडा । गजपतिही मानी थोडा ।
कां कांटिये वरिल्या सरडा । स्वर्गही नीच.

(८४) तृणाचेनि इंधनें । आगी धांवी गगनें ।
थिल्लर बळें मीनें । न गणिजे सिंधू.

(८५) अभ्रछायेचिया जोडी । निदैव घर.मोडी ।
मृगांबु देखोनि फोडी । पाणियाढें मूर्ख.

(८६) पतंगा नावडे ज्योती । खद्योता भानुची खंती ।
टिटिभेनें अपांपती । वैरी केला.

(८७) शीत जळाचिये भेटी । तातला तेली आगी उठी ।
चंद्र देखोनि जळे पोटीं । कोल्हा जैसा ॥
विश्वाचें आयुष्य जेणें उजळे । तो सूर्य उदैला देखोनि सबळे ।
पापिया फुटती डोळे । डुडुळाचे ॥
जगाची सुख पहांट । चोरां मरणाहूनि निकृष्ट ।
दुधाचें काळकूट । होय व्यालीं.

(८८) ते नाना रसीं । रिघोनि दर्वी जैसी ।
परि रस स्वादासी । चाखों नेणें ।

(८९) थोर विष भुजंगीं । अंग सानें.

(९०) धातयाही गेलिया शरण । त्रिदोषीं न चुके मरण.

(९१) सांगतां वाचा रडे । आठवितां मन खिरडे.

(९२) शास्त्र ह्मणेल जें सांडावें। तें राज्यहि तृण मानावें।
जें घेववी तें न ह्मणावें। विषही विरु.

(९३) कार्याकार्यविवेकीं। शास्त्रेंचि करावीं पारखीं।
अकृत्य ते कुडें लोकीं। वाळावें गा॥
मग कृत्यपणें खरें निगे.

अध्याय १७.

(९४) तक्षकाची फडे। ठाकोनि कैं तो मणि काढे।
कैं नाकींचा केश जोडे। सिंहाचिये?

(९५) गंगोदक जरी जालें। तरि मद्यभांडा आलें।
तें घेऊं नये कांहीं केलें। विचारींपां॥
चंदन होय शीतळु। परि अग्नीसी पावे मेळु।
तैं हातीं धरितां जाळू। न शके काई?

(९६) जीवनचि उदक। परि विषीं होय मारक।
कां मिरयामाजी तीख। उंशीं गोड.

(९७) जो तळें करी। तें तयाचीच तृषा हरी।
कीं सुआरासीचि अन्न घरीं। येरां नोहे?
येका गौतमासीच गंगा। येरां समस्तां काय जगा।
वाहाळ जाली?

(९८) दिठी घालूनि अहेरा। अवंतूं जाइजे सोयिरा.

(९९) घाणा गाळिले गुंडे। तेल ना पेंडी जोडे.

अध्यायः १८.

१००) गूळ नेणतां तोंडीं। घातला देचि गोडी
आगी मानूनि राखोंडी। चेपिला पोळी.

(१०१) हिंग त्रासला घाणीं । तरीं कैंचें सुगंधत्व आणी ।
द्रव सांडूनि पाणी । केंवि राहे तें?

(१०२) कोरडा ना वोला । उपयोगा आथी गेला ।
तो वाढोनि वोडला । भेंड जैसा.

(१०३) एका कणालागीं उंदीर । अवघा उपसा डोंगर ।
कां शेवाळा दोषें दर्दुर । समुद्र डहुळी.

मुकुंदराज.

विवेकसिंधु.

(१) जरी रुईचे झाडीं । भरती मदाचिया कावडी ।
तरी हिंडावयाची आवडी । कां पडों द्यावी.

(२) नद्या उगमीं स्थिरावती । तरी तेचि समुद्र होती ।
आधार कां नव्हती । आणिका नदीसी.

(३) पाथरवटाची टांकी । झालीचि पां अति तिखट निकी ।
तथापि करूं नये मौक्तिकीं । रंध्रशलाका.

(४) स्वर्गीची लटकी व्यवस्था । परी निद्रिस्थासी साच होय.

(५) निज शस्त्रें मरण । श्रमितासि गा.

(६) रोगियासी अपथ्याची चाड । वरी वैद्य करी भीड ।
तेथें रोगनिवृत्तीचें कोड । काय करूं येईल ?

(७) आधींच अनुचित मति । तें चि गुरु उपदेशिती.

(८) ऊंस दिसतो वांकुडे । परी अंतरीं रसाळ.

(९) याचि देहीं याचि डोळां । जरि न पविजे मुक्तिचा सोहळा ।
तरी वैराग्याच्या तातवेळा । कासया शिणावें.

एकनाथ.

स्वात्मसुख.

(१) पहा पां चंद्रकिरणीचें अमृत। तेणें चकोर होती तृप्त ॥
परी वायस काय तेथ। श्रद्धा धरिती ॥
वानर सर्व फळें खाय। परि नारळ अव्हेरूनि जाय।
तयाचे अभ्यंतरीचें काय। ठाउकें तया?

(२) इळा परिसेंसी झगटी। तों सोनेंचि होउनि उठी।
मग इळेपण पहातां दृष्टी। काय लोखंड होईल?

(३) काळ सुरनरां क्षयो करी। काळ हरिहरांस मारी।
काळ सृष्टी संहारी। मारकपणें ॥
काळ अमरांस गिळी। काळ अंतकातें छळी।
काळ प्रळय रुद्राची होळी। सकळ करी ॥
काळ ब्रह्मांडातें खाये। तेथें रुद्र विधाता कोठें राहे।
ब्रह्मांडावर्ती जें होय। तें काळाचें खाजें.

(४) जैसी चोराची माय। प्रकट रडो न ल्हाय।
परि आंतुच्या आंत होय। उकसा बुकसी ॥
कां स्वैरिणी गर्भाच्याठी। बाहेरी उमसों नेदी गोष्टी।
परि संभवलें आहे पोटीं। हें तेचि जाणें.

(५) जळगार जळीं विरोनि जाय। परि मोतीं न विरे.

(६) लोहाची बेडी तोडी। आवडी सोनियाची जोडी।
तरी बद्धता रोकडी। जैसी तैसी ॥
खैराचा शूळ मारी। काय चंदनाचा तारी?

(७) ग्रंथ हा अधिकारवशें । फळोनि दावी.

(८) मन रामीं रंगलें । अवघें मनचि राम झालें.

(९) तुझी नाम तैसी करणी ।

(१०) जन कां निंदीना निंदीना । तसेंच निंदूं द्याना ।
निंदक करिती निंदा । निंदिति हरळी शिंपीं कुंदा ।

(११) आलिया वाटांचे न मोडावे माग ।

(१२) नाहीं प्रपंच ना परमार्थ ।

(१३) ऊंस गोड झाला ह्मणून काय मुळासहित खावा ।

(१४) प्रीतीचा पाहुणा झाला ह्मणून काय फार दिवस राहवा ।

(१५) फुकाचा हत्ती झाला ह्मणून काय भलत्यांनीं न्यावा ।

(१६) फुकट हिरा झाला ह्मणून काय कथिलीं जोडावा ।

तुकाराम.

(१) अधमाची यारी । रंग पतंगाचे परी ॥
विटे न लगतां क्षण । मोल जाय वांयांविण ॥
सर्पाचिया परी । विषें भरला कल्हारीं.

(२) अंगीं ज्वर तया नावडे साकर । जन तो इतर गोडी जाणे.

(३) अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक ।
तरी कां हे पाक घरोघरीं ॥
देखोनि जीवन जरि जाय तान ।
तरी कां सांठवण घरोघरीं ॥
देखोनियां छाया सुख न पविजे ।
जंव न बैसिजे तया तळीं.

(४) अन्यत्रींचें तीर्थीं नासे । तीर्थीं वसे वज्रलेप.

(५) अंधळ्यातें नये देखण्याची चाली ।
चालीं ऐसी बोली तुका बोले.

(६) अति जालें उत्तम वेश्येचें लावण्य । परि ते सुवासीण न ह्मणावी॥
उचित अनुचित केले ठाया ठाव । गुणां मोल वाव थोरपण ॥
शूरत्वावांचूनि शूरांमाजी ठाव । नाहीं आविर्भाव आणिलिया.

(७) अमृताची गोडी पुढिलां सांगसी । आपण उपवासी मरोनियां.

(८) अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावें॥
मुंगीवरी भार गजाचें पाळण । घालितां तें कोण कार्यसिद्धि ?

(९) अंधारें दीपका आणियेली शोभा। माणिकासी प्रभा कोंदणाची॥
धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखी काय चाडा जाणावें तें॥
अमृतासी मोल विषाचिया गुणें। पितळे तरी सोनें उंच नीच.

(१०) अंतरींचा रंग उमटे बाहेरी। वोळखि यापरी आपेंआप.

(११) अर्थेविण पाठांतर कासया करावें। व्यर्थचि मरावें घोकूनियां.

(१२) आणिकांच्या घातें। ज्यांचीं निवतील चित्तें॥
तेचि ओळखावे पापी.

(१३) आंधळ्यासि जन अवघेचि आंधळे।आपणासि डोळे दृष्टी नाहीं॥
रोग्यां विषतुल्या लागे हें मिष्टान्न। तोंडासि कारण चवी नाहीं॥
तुका ह्मणे शुद्ध नाहीं जो आपण। तया त्रिभुवन अवघें खोटें.

(१४) आशाबद्ध वक्ता। धाक श्रोतियाच्या चित्ता.

(१५) आमिषाचे आसे गळ गिळी मासा।
फुटोनियां घसा मरण पावे.

(१६) आधींच आळशी। वरी गुरूचा उपदेशी॥
मग त्या कैंची आडकाठी। विधिनिषेधाची भेटी.

(१७) आधारावांचुनि। काय सांगसी काहाणी.

(१८) आशा हे समूळ खाणोनि काढावी। तेव्हांची गोसावी व्हावें तेणें॥
नाहींतरी सुखें असावें संसारीं। फजिती दुसरी करूं नये॥
आशा मारूनियां जयवंत व्हावें। तेव्हांचि निघावें सर्वांतूनि.

(१९) आलें देवाचिया मना। तेथें कोणाचें चालेना.

(२०) आपल्याचा कळवळा। आणिका बाळावरी नये.

(२१) आपलें केलें आपण खाय । तुका वंदी त्याचे पाय.

(२२) आणितां त्या गती । हंस काउळे न होती.

(२३) आपणा सारिखे करिती तात्काळ ।
कांहीं काळवेळ नलगे त्यांशी.

(२४) आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्यां भटां जाली धणी.

(२५) आधीं होता वाघ्या । दैवयोगें झाला पाग्या ॥
त्याचें यळकोट राहिना । देहस्वभाव जाईना.
आधीं होता ग्रामजोसी । राज्यपद आलें त्यासी ॥
त्याचें पंचांग राहीना । देहस्वभाव जाईना.
आधीं होती दासी । पट्टराणी केलें तिसी ॥
तिचें हिंडणें राहीना । देहस्वभाव जाईना.

(२५ अ) उपदेश तो भलत्या हातीं । जाला चित्तीं धरावा ॥
नये जाऊं पात्रावरी । कवटी सारी नारळें ॥
तुका ह्मणे रत्नसार । परि उपकार चिंधीचे.

(२६) उधळितां माती रविकळा मळे । हें कैसे न कळे भाग्यहीना ॥
तुका ह्मणे तृणें झांके हुताशन । हें तंव वचन वाउगें चि.

(२७) उसनें फेडितां धर्म तो कवण । काय तया जन मानवेल.

(२८) उपजल्या पिंडा मरण सांगातें । मरतें उपजतें सवेंचि तें.

(२९) उदक अग्निधान्य जाहल्या घडे पाक ।
एकाविण एक कामा नये.

(३०) उंबरांतील कीटका । हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा.

(३१) उगेचि फुगवूं नका गाल । पूर्ण सांठवावा माल.

(३२) उंच वाढला एरंड । तरि का होइल इक्षुदंड.
जरी गर्दभ वेगीं धांवे । तरि का अश्वमोल पावे.

(३३) ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतित पावना देवराया ॥
संसार करितां ह्मणती हा दोषी । टाकितां आळसी पोटपोसा॥
आचार करितां ह्मणती हा पसारा। न करितां नरा निंदिताती॥
संतसंग करितां ह्मणती हा उपदेशी।येरा अभाग्यासि ज्ञान नाहीं॥
धन नाहीं त्यासि ठायींचा करंटा। समर्थासी ताठा लावीताती॥
बहु बोलों जातां ह्मणति हा वाचाळ ।
न बोलतां सकल ह्मणती गर्वी ॥
भेटिसि न जातां ह्मणती हा निष्ठूर। येतां जातां घर बुडविलें ॥
लग्न करूं जातां ह्मणती हा मातला। न करितां जाहला नपुंसक॥
निपुत्रिका ह्मणती पहा हो चांडाळ। पातकाचें मूळ पोरवडा ॥
लोक जैसा ओक धरितां धरवेना । अभक्ता जिरेना संतसंग.

(३४) एका बीजा केला नास । मग भोगलें कणीस.

(३५) एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्याचे घरीं ॥
पाप नलगे धुंडावें । लागेल तेणें तेथें जावें.

(३६) एका शेरा अन्ना चाड । येर वाउगी बडबड.

(३७) एका हातें टाळी । कोठें वाजते निराळी.

(३८) एक ह्मणे भलें । आणिका सहजचि निंदिलें.

(३९) एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां । हाणोनियां लाता पळालें तें ॥
गाढवही गेलें ब्रह्मचर्य गेलें । तोंड काळें झालें जगामाजी.

(४०) ओलें मूळ भेदी खडकाचें अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥
नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड। नाहीं कईवाड तोंचवरी ॥
दोरें चिरा कापे पडिला कांचणी। अभ्यासें सेवनीं विष पडे ॥
तुका ह्मणे कैंचा बैसण्यासि ठाव। जठरीं बाळा वाव एकाएकीं.

(४१) कानडीनें केला मऱ्हाटा भतार। एकाचें उत्तर एका नये ॥
तिनें पाचारिलें इल बा ह्मणोन। येरु पळे आण जाहली आतां ॥
तुका ह्मणे येर येरा जें विच्छिन्न। तेथें वाढे सीण सुखा पोटीं.

(४२) करुनी खातां पाक जिरे सुरणराई।
करितां अतित्याई दुःख पावे.

(४३) काय दिनकरा। केला कोंबड्यानें खरा.

(४४) कन्या सासुऱ्यासि जाये। मागें परतोनी पाहे.

(४५) काय कळे बाळा। बाप सदैव दुबळा ॥
आहे नाहीं हें न कळे। हातीं काय कोण्या वेळे ॥
देखिलें तें दृष्टी। मागे घालोनियां मिठी.

(४६) कमोदिनी काय जाणे तो परिमळ। भ्रमर सकळ भोगीतसे.

(४७) करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ। खापरों परीस काय करी॥
काय करिल तया साखरेचें आळें। बीज तैसीं फळें येती तया.

(४८) काय दरा करील वन। समाधान नाहीं जंव ॥
काय भस्म करील राख। अंतर पाक नाहीं तों.

(४९) कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी।आपुलें भिकारी अर्थ नेणे.

(५०) कासया एकांत सेवूं तया वना। आनंद तो जनामाजी असे.

(५१) कल्पतरु रुया नव्हती बाभुळा। पुरविती फळा इच्छितिया ॥
उदंड त्या गाई ह्मैसी आणि शेळ्या ।
परि त्या निराळ्या कामधेनु.

(५२) कुटल्याविण नव्हे मांडा । अळसें धोंडा पडतसे.

(५३) कोरड्या गोष्टी चटक्या बोल । शिकल्या सांगे नाहीं ओल.

(५४) कृपेचा ओलावा । दिसे वेगळाचि.

(५५) काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ॥
काय सेज बाज माकडा विलास । अलंकारा नास करुनी टाकी
तुका ह्मणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें.

(५६) खादलें पचे तरिच तें हित । ओकलिया थीत पिंड पीडी.

(५७) खरें बोले तरी । फुकासाठीं जोडे हरी.

(५८) खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलेंचि नीट उसंतावें.

(५९) खोल ओले पडे तें पीक उत्तम । उथळाचा श्रम वायां जाय.

(६०) खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग । साक्षी तंव जग उभयतां.

(६१) गेली वीरसरी । मग त्यासी रांड मारी ॥
मग नये तैसी सत्ता । गेली मागील आणितां ॥
भंगलिया चित्ता । नये काशानें सांदितां.

(६२) गंगेचिया अंताविण काय चाड । आपुलें तें कोड तृषपोशीं ॥
कारण तें असे नवनीतापाशीं । गबाळ तें सोसी इतर कोण?

(६३) गाढवाचें तानें । पालटलें क्षणक्षणें ॥
उपजतां बरें दिसे । रूप वाढतां तें नासे.

(६४) गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राखेसवें भेटी केली तेणें ॥
सहज गुण जयाचे देहीं । पालट कांहीं नव्हे तया ॥
माकडाचे गळां मोलाचा मणि। घातला चावुनी टाकी थुंकोनि.

(६५) गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर.

(६६) गोमट्या बीजाचीं फळेंही गोमटीं । बाहे तेंचि पोटीं समतूक.

(६७) गाढव शृंगारिलें कोडें। कांहीं केल्या नव्हे घोडें ॥
त्याचें भुंकणें न राहे । स्वभावासी करील काये ॥
श्वान शिबिके बैसविलें । भुंकतां न राहे उगलें ॥
तुका ह्मणे स्वभाव कर्म। कांहीं केल्या न सुटे धर्म.

(६८) गाढव गंगेसी न्हाणीलें । जाउनि उकरड्यावरि लोळे.
भीती पोसिलें काउळें । जाउनि विष्टेवरी लोळे ॥

(६९) चित्त समाधानें । तरी विष वाटे सोनें ॥
मनाच्या तळमळें । चंदनेंही अंग पोळे.

(७०) चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि काय ।
वत्स सांडी माय तेणें न्यायें ॥
भीतीचा तो वायु गोड लागे मात ।
जरी जाय चित्त मिळोनियां.

(७१) चौघांमध्यें बरें दिसेसें । तेथें नेमक व्हावें.

(७२) चंदनाचे हात पायही चंदन ॥ परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड॥
तुका ह्मणे तैसा सज्जनापासून । पाहतां अवगुण मिळेचिना.

(७३) चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राणनाशी.

(७४) चोरटें सुनें मारलें टाळें। कुंउं करी परि न संडी चाळे.

(७५) चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती। व्याघ्र हे न खाती सर्प तया॥
विष तें अमृत आघात तें हित। अकर्तव्य नीत होय त्यासी॥
दुःख तें देईल सर्व सुख फल। होतील शीतळ अग्निज्वाळा.

(७६) चित्रींचें लेप शृंगारिलें निकें। जीवेंविण फिकें रूप त्याचें.

(७७) चंदनाच्या वासें वसतां चंदन। होती काष्ट आन वृक्षयाती.

(७८) चोरा रुचे निशी। देखोनियां विटे शशी.

(७९) चोरासी चांदणें वेश्येसी सेजार। परिसेंसी खापर काय होय॥
दुधाचे आधणीं वैरिले पाषाण। कदा काळीं जाण पाक नव्हे.

(८०) जेणें मुखें स्तवी। तेंचि निंदे पाठीं लावी॥
ऐसी अधमाची याती। लोपी सोनें खाय माती॥
विंचु लाभाविण। तुका ह्मणे वाहे शीण.

(८१) जे का रंजले गांजले। त्यांसि ह्मणे जो आपुले॥
तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा.
मृदु सबाह्य नवनीत। तैसें सज्जनाचें चित्त.

(८२) जाळूं नये नाव पावलेनि पार। मागील आधार बहुतांचा.

(८३) जेवीं नवज्वरें तापलें शरीर। लागे तया क्षीर विषतुल्य॥
तेवीं परमार्थ जीहीं दुरावला। तया लागीं झाला सन्निपात॥
कामिनी जयाच्या जाहाली नेत्रासी। देखी तो चंद्रासी पीतवर्ण॥
तुका ह्मणे मद्यपानाची आवडी। न रुचे त्या गोडी नवनीताची.

(८४) जन देव तरी पायांचि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं॥
अग्नीचें सौजन्य शीत निवारण । पाल्वीं बांधोनि नेतां नये॥
तुका ह्मणे विंचु सर्प नारायण । वंदावे दुरोन शिवों नये.

(८५) जीव तोचि देव भोजन ते भक्ति।मरण तेचि मुक्ति पाषंड्यांची॥

(८६) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टवीती उपकारें॥
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं॥
तुका ह्मणे सुख परावीया सुखें॥ अमृत हें मुखें स्रवतसे.

(८७) जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची.

(८८) जाऊनियां तीर्थां काय तुवां केलें। चर्म प्रक्षाळिलें वरी वरी॥
अंतरीचें शुद्ध कासयानें झालें । भूषण त्वां केलें आपणया॥
वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचिना॥
तुका ह्मणे नाहीं शांति क्षमा दया। तोंवरी कासया फुंदां तुम्ही.

(८९) जिचें पीडे बाळ। प्राण तियेचा विकळ॥
ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एक जीव.

(९०) ज्याचिया बैसावें भोजन पंगती । त्याचिया संगती तैसें खावें.

(९१) जाणतें लेकरूं । माता लागे दूर धरूं.

(९२) जन हें सुखाचें दिल्या घेतल्याचें ।
अंत हें काळींचें नाहीं कोणी.

(९३) जो मुळव्याधी पीडिला।त्यासी देखोन हांसे खरजुला॥
आरथ करी सोसी। त्यासी हांसे तो आळसी॥
क्षयरोगी ह्मणे परता। सर रोगिया तूं आतां॥
वडस दोहीं डोळां वाढले। आणिकां कानें कोंचें ह्मणे.

९४) जरी आलें राज्य मोळविक्या हातां।तरी तो मागुता व्यवसायी॥
तृष्णेची मजुरें नेणती विसांवा। वाढे हांवहांवा काम कामीं.

(९५) टिळा टोपी माळा कंठीं। अंधारीं नेउनि चेंपी घांटी.

(९६) टिळा टोपी माळा देवाचें गवाळें। वागवी वोंगळें पोटासाठीं॥
तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडी। लटिकी धरी बोंडी नासिकाची॥ कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे। प्रेमेंविण डोळे गळताती॥ तुका ह्मणे ऐसे मावेचे मइंद.

(९७) ठेविलिया दिसे रंगा ऐसी शिळा।उपाधि निराळा स्फटिक मणी.

(९८) ढेंकरें जेवण दिसे साचें। नाहीं तरी काचें कुंथाकुंथी॥
तुका ह्मणे असे हातींचें कांकण। तयासी दर्पण विल्हाळक.

(९९) ढेंकणाचे बाजे सुखाची कल्पना। मूर्खत्व वचना येऊं पाहे.

(१००) तुका ह्मणे हित देखण्यासि कळे। पडती आंधळे कूपामाजी.

(१०१) तुका ह्मणे बळी। तो गांढ्याचे कान पिळी.

(१०२) तुका ह्मणे हिरा। पारखियां, मूढां गारा.

(१०३) तुका ह्मणे रणीं। नये पाहों परतोनि.

(१०४) तोडिलें तुटतें जडती जडलें।आहे तें आपुलें आपणापें.

(१०५) तुका ह्मणे काय उपदेश खळा। न्हाउनि काउळा क्षतें धुंडी.

(१०६) तोंडी विडा माने ताठा। थोरपणें घाली गेंठा.

(१०७) तुका ह्मणे पीक। भूमि न दे, न मिळे भीक.

(१०८) तुका ह्मणे बळें पारखिया हिरा। ओझें पाठी खरा चंदनाचें.

(१०९) तुका ह्मणे बोकड मोहो। धरी पहा हो खाटिक.

(११०) तोंवरि तोंवरि शोभतील गारा। जंव नाही हिरा प्रकाशला॥
तोंवरि तोंवरि शोभती दीपिका। नुगवतां एका भास्करासी.

(१११) तुका ह्मणे एथें पाहिजे जातीचें। येरा गाबाळाचें काम नाहीं.

(१११ अ.) तुका ह्मणे गोड। बहु जालें अति वाड॥
ह्मणोनि कां बुडें। मुळ्यांसहीत खावें ?

(११२) तटाचे जातीला नाहीं भीड भार। लाता मारी थोर लहान नेणें.

(११३) ताकें कृपण तो जेवूं काय घाली। आहाच ते चालीवरुनि कळे.

(११४) तान्हेल्यानें पीतां पाणी। तेणें गंगा नव्हे उणी.

(११५) तांबियाचें नाणें न चले खऱ्या मोलें।
जरी हिंडविलें देशोदेशीं.

(११६) दुधाळ गाढवी जरी झाली पाहे। पावेल ते काय धेनुसरी॥
कागाचिया गळां पुष्पांचिया माळा। हंसाची तो कळा काय जाणे॥
मर्कटें आंघोळी लावियेले टिळे। ब्राह्मणाचे लीळे वर्तू नेणें.

(११७) दर्पण नावडे तया एका। ठाव नाहीं ज्याच्या नाका.

(११९) दोहीं पेवावरी ठेवूं जातां हात। शेवटीं अपघात शरीराचा.

(११९ अ.) देव अंतरे तें पाप।

(१२०) दुष्टबुद्धि चोरी करी निरंतर। तो ह्मणे इतर लोक तैसे।
तुका ह्मणे जया चित्तीं जे वासना। तयाची भावना तयापरी.

(१२१) दया तिचें नांव भूतांचें पाळण। अणीक निर्दळण कंटकांचें॥
पाप त्याचें नांव न विचारितां नीत भलतेंचि उन्मत्त करी सदा.

(१२२) दगडाची नाव आधींच ते जड । ते काय दगड तारूं जाणे ?

(१२३) देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥
जया देवाची जतन । तया बाधूं न शके अग्न.

(१२४) देवाच्या संबंधें विश्वचि सोयरें । सूत्र ओढे दोरें एका एक.

(१२५) दर्पणासी नकटें लाजे । शुद्ध खिजे देखोनि ॥
अंधळ्यास काय हिरा । गारांचे तो सारिखा.

(१२६) दया क्षमा शांति । तेथें देवाची वसति.

(१२७) देव राखे तया मारील कोण । न मोडे काय हिंडत वन ॥
न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तेंही अमृत पाहीं.

(१२८) दर्पणीचें दिलें धन । दिसे पण चरफड.

(१२९) दुष्टाचें चित्त न भिने अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला ॥
पालथे घागरी घातलें जीवन । न धरीच जाण तेंही त्याला ॥
पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहातां अंतरीं कोरडा तो.

(१३०) दुष्ट भूषण सज्जनाचें । अलभ्य लाभ पुण्य त्याचें.

(१३१) दुर्बळाचें कोण । ऐके घालूनियां मन.

(१३२) दुर्बळाचें हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी.

(१३३) दह्यांचिया अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये॥
आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें । दोहींशीं समान पाहों नये.
पृथिवीच्या पोटीं हिरा गारगोटी । दोहीसीं संसाटी करूं नये.

(१३४) दुबळें सदैवा । ह्मणे नागवेल केव्हां ॥
आपणासारिखें तया पाहे । स्वभावासी करिल काय ॥
मूढसभे आंत । इच्छी पंडिताचा घात ॥
गांढें देखुनि शूरा । उगें करितें बुरबुरा.

(१३५) धांवे जातीपाशीं जाती। खुण येर येरां चित्तीं.

(१३६) धीर तो कारण। साह्य होतो नारायण.

(१३७) धनासींच धन। करी आपण जतन.

(१३८) धनवंता लागीं। सर्व मान्यता आहे जगीं॥
मातापिता बंधुजन। सर्व मानिती वचन॥
जन मोठा चाले धंदा। तंव बहीण ह्मणे दादा॥
सदा शृंगार भूषणें। कांता लवे बहुमानें॥
तुका ह्मणे धन। भाग्य अशाश्वत जाण.

(१३९) धोंड्यासवें आदळितां फुटे डोकें।
तो तों त्याच्या दुःखें घामेजेना.

(१४०) नये नेत्रां जळ। नाहीं अंतरीं कळकळ.

(१४१) नलगे चंदना सांगावा परिमळ। वनस्पतिमेळ हाकारूनी॥
अंतरीचें धांवे स्वभावें बाहेरी। धरितांही परी आवरेना॥
सूर्य नाहीं जागें करीत या जना। प्रकाश किरणा कर म्हून.
तुका ह्मणे मेघ नाचवी मयूरें। लपवितां खरें येत नाहीं.

(१४२) नसे तरी मनीं नसो। परी वाचे तरी वसो.

(१४३) नाहीं निर्मळ जीवन। काय करील साबण॥
तैसी चित्तशुद्धि नाहीं। तेथें बोध करील काई॥
वृक्ष न धरी पुष्पफळ। काय करील वसंत काळ॥
वांझे न होती लेंकरें। काय करावें भ्रतारें.

(१४४) नाहीं संतपण मिळतें हें हाटीं। हिंडतां कपाटीं रानीं वनीं॥
न ये मोल देतां धनाचिया राशी। नाहीं तें आकाशीं पाताळींतें॥

तुका ह्मणे मिळे जिवाचियेसाठीं ।नाहीं तरी गोष्टी बोलों नये.

(१४५) नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें.

(१४६) निंदास्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट.

(१४७) नाहीं मागें येत बोलिलें वचन । पावावा तो सीण बरा मग.

(१४८) नीचिये कुळींचा उंचा वंद्य होय । हरीचे जो गाय गुणवाद.

(१४९) नारे तरि काय नुजेडे कोंबडें । करूनियां वेडें आग्रो दावी.

(१५०) नाहीं घांटावें लागत । एका सितें कळे भात.

(१५१) नाहीं लोपों येत गुण । वेधी आणिकें चंदन.

(१५२) निंबाचिया झाडा साकरेचें आळें। आपलीं तीं फळें न संडीच॥
तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करुनी सांडी॥
परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें॥
तुका ह्मणे वेळू चंदनासंगतीं । काय ते नसती जवळीकें.

(१५३) नाभीं मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं.

(१५५) परिमळ म्हूण चोळूं नये फूल । खाऊं नये मूल आवडतें॥
मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेदुनि नाद पाहूं नये.

(१५६) पवित्र सोंवळीं । एक तींच भूमंडळीं॥
ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव.

(१५७) प्रत्यक्षासि काय द्यावें हें प्रमाण ।

(१५८) पोटाचें होटा आणवी ।

(१५९) पिळोनियां पाहे पुष्पाचा परिमळ ।
चिरोनि केळी केळ गाढव तो.

(१६०) पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न करूनियां.

(१६१) पर्जन्याचे काळीं वाहाळाचे नद । ओसरतां बुंद न थारे चि.
हिऱ्या ऐशा गारा दिसती दूरोन । तुका ह्मणे घन न भेटे तों.

(१६२) पोटाचे ते नट पाहों नये छंद । विषयांचे भेद विषयरूप.

(१६३) पात्रावया फळ । अंगीं असावें हें बळ.
तुका ह्मणे तंई । सिद्धि वोळगती पायीं.

(१६४) पुण्यपर उपकार पाप ते परपीडा ।
आणीक नाहीं जोडा दुजा यासी.

(१६५) पोसी वांज गाय । तेथें कैंची दुध साय ॥
फुटकी सांगडी । तुका ह्मणे न पवे थडी.

(१६६) पोट लागलें पाठीशीं । हिंडवितें देशोदेशीं ॥
पोटाभेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ॥
जपतप अनुष्ठान । पोठासाठीं जाले दीन ॥
पोटें सांडियेली चवी । नीचा पुढें तें नाचवी ॥
पोट काशियानें भरे । तुका ह्मणे झुरझुरूं मरे.

(१६७) पिसांची पारवीं । करोनि बाजागिरी दावी.

(१६८) पायींची वाहाण पायीं बरी.

(१६९) फिरंगी वाखर लोखंडाचे विळे ॥ परि ते निराळे गुणमोल ॥
पायरी प्रतिमा एकचि पाषाण । परि तें महिमान वेगळालें.

(१७०) फळ पिके देंठीं । निमित्य वारियाची भेटी.

(१७१) फिरंगीच्या योगें करी । राजा काष्ठ हातीं धरी ॥
रत्नकनका योगें लाख । कंठीं धरिती श्रीमंत लोक.

(१७२) बीजा ऐसें फळ दावी परिपाकीं।परिमळ लौकिकीं जाती ऐसा.
(१७३) बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे.
(१७४) बहुत अन्न विष मोहरीच्या मानें । अवघेंचि तेणें विष होय.
(१७५) बाळ माते पाशीं सांगे तान भूक । उपायाचें दुःखकाय जाणे.
(१७६) बहु धड जरी जाली ह्मैस गाय । तरी होइल काय कामधेनु !
(१७७) बीजा ऐसीं फळें । उत्तम कां अमंगळें.
(१७८) बोले तैसा चाले । तुका ह्मणे तो अमोल.
(१७९) बाळकासी चिंता काय पोटव्यथा । जया शिरीं मायबाप.
(१८०) बीज तेंचि फळ येईल शेवटीं । लाभ हानि तुटी ज्याची तया
(१८१) बुद्धिमंदा शिरीं । भार फजिती पदरीं ॥
जाय तेथें अपमान । पावे हानि थुंकी जन.
(१८२) बीज पेरूनियां तेंचि घ्यावें फळ। होरलीस केळें कैंचें लागे.
(१८३) बळ करी तया भ्यावें । पळों लागे तया घ्यावें.
(१८४) बीज न पेरावें खडकीं । ओल नाहीं ज्याचे बुडखीं.
(१८५) बहुतां छंदांचें बहु वसे जन । नये बांटू मन त्यांच्या संगें.
(१८६) बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर.
(१८७) बोलाचीच कढी बोलाचाचि भात। जेवूनियां तृप्त कोण जाला॥
कागदीं लिहितां नामाची साकर । चाटितां मधुर गोडी नेदी.
(१८८) बसतां चोरापाशीं तैसी होय बुद्धि।देखतांचि चिपी मन धांवें॥
व्यभिचाऱ्यापासीं बैसतां क्षणभरी । देखतांचि नारी मन धांवें.

(१८९) बोले तैसा चाले। त्याचीं वंदीन पाउलें ॥
अंगें झाडीन अंगण। त्याचें दासत्व करीन ॥
त्याचा होईन किंकर। उभा ठाकेन जोडोनि कर.

(१९०) बाळ शेंबडें मातेसी। काय नावडे तियेसी.

(१९१) भाडेकरी वाहे पाठीवरी भार। अंतरींचें सार लाभ नाहीं.

(१९२) भोरप्यानें सोंग पालटिलें वरी। बकध्यान धरी मत्स्य जैसें ॥
टिळे माळा मंद मुद्रा लावी अंगीं। देखों नेदि जगीं फांसे जैसे॥
ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा। भीतरील फांसा कळों नेदी॥
खाटिक हा स्नेहवादें पशुपाळी। कापावया नळी तयासाठीं.

(१९३) भुंकती तीं द्यावी भूंकों। आपण त्यांचें नये शिकों ॥
भाविकांनीं दुर्जनाचें। मानूं नये कांहीं साचें.

(१९४) भुके नाहीं अन्न। मेल्यावरी पिंडदान ॥
हे तों चाळवाचाळवी। केलें आपणचि जेवी.

(१९५) भल्याचें दर्शन। तेथें शुभचि वचन.

(१९६) भुकुंनिया सुनें लागे हस्ती पाठीं। होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥
काय त्या मशकें तयाचें करावें। आपुल्या स्वभावें पीडतसे ॥
मातलें बोकड विटवी पंचानना। घेतलें मरणा धरणें तें.

(१९७) भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा। तेथें अनुभवाचा काय पंथ।
वाढवुनी जटा फिरे दाही दिशा। तरी जंबुवेषा सहज स्थिति।
कोरोनियां भूमी करिती मधीं वास। तरी उंदरास काय वाणी।
तुका ह्मणे ऐसें कासया करावें। देहासीदंडावें वाउगेंचि ॥

(१९८) मन शुद्ध तया काय करिसी माळा। मंडित सकळा भूषणांसी.

(१९९) मिरासीचें म्हूण सेत । नाहीं देत पिक उणें.

(२००) मांडे पुऱ्या मुखें सांगों जाणे मात। तोंडीं लाळ हात चोळी रिते.

(२०१) मोहोऱ्याच्या संगें । सुत नव्हे आगी जोगें.

(२०२) माप तैसी गोणी । तुका ह्मणें रितीं दोन्ही.

(२०३) मन गुंतलें लुलयां । जाय धांवोनि त्या ठाया ॥
मागें परतावी तो बळी । शूर एक भूमंडळीं.

(१०४) मद्दुरा ऐसीं फळें नाहीं । आलीं कांहीं गळती ॥
पक्कदशे येती थोडीं । नास आढी वेचे तों.

(२०५) मागों नेणे परी माय जाणे वर्म। बाळा नेदी श्रम पावों कांहीं.

(२०६) मोहरी कांदा ऊंस । एक वाफा भिन्न रस.

(२०७) मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा।कपाळींचा धोंडा? उभा ठाके.

(२०८) मुंगीचिया घरा कोण जाय मूळ।
देखोनियां गूळ धांव घाली ॥
याचकाविण काय खोळंबला दाता ।
तोचि धांवे हिता आपुलिया ॥
उदक अन्न काय ह्मणे मज खाये ।
भुकेला तो जाय चोजवीत ॥
व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा ।
दुःखाच्या परिहारा आपुलीया.

(२०९) मायें मोकलिलें कोठें जावें बाळें । आपुलिया बळें न वंचे तें.

(२१०) मोलें घातलें रडाया । नाहीं असुं आणि माया.

(२११) माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा ॥
नागवी धावणें । तेथें साह्य व्हावें कोणें ॥
राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण वारी.

(२१२) मुंगी होउनि साखर खावी। निज वस्तूची भेटी घ्यावी ॥
वाळवंटीं साखर पडे । गज येउनि काय रडे.

(२१३) माकडा दिसती कंवटी नारळा । भोक्ता निराळा वरील सारी ॥
एका रस एका तोंडीं पडे माती । आपुलाले नेती विभाग ते ॥
सुनियांसी क्षीर वाढिल्या ओकवी। भोगि त्या पोसवी धणी वरी ॥
तुका ह्मणे भार वागविती मूर्ख । नेतील तें सार परीक्षक.

(२१४) येथें द्यावें तैसें घ्यावें । थोडें परी निरें व्हावें.

(२१५) युक्तीचें गौरव नसतां जिव्हाळा । सांचवणी जळा परी नाश.

(२१६) राया रंका एकी सरी ।

(२१७) रासभ धुतला महा तीर्थामाजी । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥
तेवीं खळा काय केला उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥
सर्पासी पाजिलें शर्करा पीयूष । अंतरीचें विष जाऊं नेणे ॥
तुका ह्मणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवेंचि वमन जेवीं तया.

(२१८) रायाचिये घरीं भाग्यवंता मान । इतरां सामान्यां मान नाहीं.

(२१९) रत्नाचा जोहारी रत्नचि पारखी । येर देखा देखीं हातीं घेती.

(२२०) रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ॥
निर्नासिका जैसा नावडे आरसा। मूर्खा लागीं तैसा शास्त्रबोध.

(२२१) .. .. .. लोभ्या नावडती पोरें ।
पाहे रुक्याकडे । मग अवघें ओस पडे.

(२२२) लपविलें तें ही ढेंकरें उमटे ।

(२२३) वैद्य वांचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ॥
नवसें कन्या पुत्र होती । तरी कां करणें लागे पती.

(२२४) वदे वाणी परि दुर्लभ अनुभव । चालीचाचि वाहो बहुतेक.

(२२५) व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय। याचें नांव काय पुण्य असे.

(२२६) वसोनि थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥
नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी करी हांवा ॥
फुगतें काऊळें । ह्मणे मी राजहंसा आगळें ॥
गजाहूनि खर । ह्मणे चांगला मी फार ॥
मुलाम्याचें नाणें । तुका ह्मणे नव्हे सोनें.

(२२७) वाईटानें भले । होनें दाविलें चांगलें ॥
एका विण एका । कैचें मोल होतें फुका ॥
विषें दाविलें अमृत । कडू गोड घातें हित ॥
काळिमेनें ज्योती । दिवस कळों आला राती ॥
उंच निच गारा । हिरा परिस मोहरा ॥
तुका ह्मणे भले । ऐसे नष्टांनीं कळले ॥

(२२८) व्यालीचिये अंगीं असती वेधना । तुका ह्मणे मना मन साक्ष ॥

(२२९) वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव.

(२३०) व्यालीचा कळवळा । जीव बहुत कोंवळा.

(२३१)—वैद्यासी ते भीड मरण रोग्या ।

(२३२) विद्या अल्प परी गर्व शिरोमणि। मजहुनी ज्ञानी कोण आहे॥
अंगीं भरला ताठा कोणातें मानिना.

(२३३) शेजारणीच्या गेली रागें । कुतऱ्यांनीं घर भरलें मागें.

(२३४) शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं.

(२३५) शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा.

(२३६) शूर तों तयासी बोलिजे जाणा । पाठीशीं घालुनि राखे दीना.

(२३७) शूकरासी विष्टा माने सावकास। मिष्टान्नाची त्यास काय गोडी॥
श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरी ॥
तुका ह्मणे सर्पा पाजिलीया क्षीर। वमितां विखार विष जालें.

(२३८) शृंगारिलें नाहीं तगों येतवरी । उमटे लौकरी जैसें तैसें.

(२३९) शाहाणियां पुरे एकचि वचन । विशारती खुण तेचि त्यासी.

(२४०) शूरां साजती हतियारें । गांढ्यां हांसतील पोरें.

(२४१) श्वाना दिली सेवे । पायां भोंवतें तें भोंवे ॥
जेवितां जवळी । येऊनियां पुच्छ घोळी.

(२४२) शुद्ध कसूनि पाहावें । वरि रंगा न भुलावें.

(२४३) शांतिखड्ग हातीं । काळासी ते नागविती.

(२४४) सोनें दावी वरी तांबें तया पोटीं । खरियाचें साठीं विकूं पाहे॥
पारखी तो जाणे तयाचे जीवींचें । निवडी दोहींचें वेगळालें ॥
क्षीरानीरा कैसें होय एकपण । स्वादी तोचि भिन्न भिन्न काढी.

(२४५) सासूसाठीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥
मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥
जैसी वृंदावन कांती । उत्तम धरूं नये हातीं ॥
बक ध्यान धरी । सोंग करूनि मासे मारी ॥
तुका ह्मणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले.

(२४६) सोन्या सेजारीं तों लाखेची जतनं । सतत ते गुण जैसे तैसे.

(२४७) सेवकासी आज्ञा स्वामीची प्रमाण। जोंवरी हा प्राण जाय त्याचा.

(२४८) समर्थाचे पोटीं । आह्मी जन्मलों करंटीं.

(२४९) समर्थासी बोले कोण ।

(२५०) सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥
नको पृथकाचे भरी । पडों एक मूळ धरीं ॥
वश झाला राजा । मग आपुल्या त्या प्रजा.

(२५१) सावित्रीचें विटंबण । रांडपण करीतसे ॥
काय जाळावें तें नांव । अवघें वाव असे तें ॥
कुबेर नांव मोळी वाहे । कैसी पाहें फजिती.

(२५२) सकळ यातींमध्यें ठक हा सोनार। त्या घरीं व्यापार झारियाचा.

(२५३) सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हुंतूंपण कामा नये.

(२५४) संगतीनें होतो पंगतीचा लाभ ।

(२५५) सेवकासी आज्ञा निरोपासी काम। स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे॥

(२५६) सदां सर्व काळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥
ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति।तेणें अंगें विभूती लावूं नये
जयासी नकळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥
ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥
तुका ह्मणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये.

(२५७) सुख पहातां जवा पाडें । दुःख पर्वताएवढें.

(२५८) सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन.

(२५९) साखरेसी ह्मणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे.

(२६०) सहज बोलणें हित उपदेश ।

(२६१) सांपडला संदीं । मग बळिया पडे बंदीं ॥
दाता मागे दान । जाय याचका शरण ॥

(२६२) सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ॥
आला डोळ्यांसी कवळ । तेणें मळलें उजळ.

(२६३) सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षावया दिलें श्वानालागीं ॥
मुक्ताफळहार खरासि घातला।कस्तुरी सुकराला चोजविली ॥
वेदपरायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खुण काय जाणे ॥
तुका ह्मणे ज्याचें तोचि एक जाणे.

(२६४) साधूनी बचनाग खाती तोळा तोळा।आणिकां ते डोळां न पहावे.
साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनियां.
असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका ह्मणे.

(२६५) सुख अंतरीचें बाह्य रसठसी ।

(२६६) स्फटिकाची शिळा उपाधि न मिळे।भाव दावी पिवळे लालसंगें.

(२६७) समर्थाच्या नांवें । भलतैसें विकावें.

(२६८) सागरीं थेंबुडा । पडिल्या निवडे कोण्या वाटा.

(२६९) सांडुनिया हिरा । कोणें वेंचाव्या त्या गारा.

(२७०) सरिता मिळाली सागरीं । आणिकां नावा कैची उरी ॥
अनेक दीपांचा प्रकाश । सूर्य उगवतां नाश.

(२७१) हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥
तोचि मोल पावेखरा । करणीचा होय चुरा ॥

मोहरा होय तोचि अंगें । सूत न जळे ज्याचे संगें ॥
तुका ह्मणे तोचि संत । सोसी जगाचे आघात.

(२७२) होता भाव पोटीं । मुखा आलासे शेवटीं ॥
तुका ह्मणे कुडें । कळों येतें तें रोकडें.

(२७३) हातीं होन दावी बेना ; करिती लेंकीच्या धारणा.

(२७४) हालवूनि खुंट । आधीं करावा बळकट ॥
मग तयाच्या आधारें । करणें अवघेंचि बरें.

(२७५) हातींच्या कांकणा कायसा आरसा ।

(२७६) हिरा ठेवितां गाहाण । मोल न तुटे दुकाळीं जाण.

(२७७) क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥
तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि । जाय तो विझोनि आपसया.

(२७८) ज्ञानभांडाराचें पोतें । रिते नव्हें कल्पांतीं.

(२७९) कामातुरा भय लाज ना विचार। शरीर असार तृणतुल्य.

(२८०) कांहीं चिंतेविण । नाहीं उपजत सीण.

(२८१) केला पण सांडी । ऐसीयासी ह्मणती लंडी.

(२८२) काय सर्प खातो अन्न । काय ध्यान बगाचें ॥
अंतरींची बुद्धि खोटी । भरलें पोटीं वाईट ॥
काय उंदीर नाहीं धांवीं । राख लावी गाढव ॥
तुका ह्मणे सुसर जळीं । कावळीं कां न न्हाती.

(२८३) काजव्याच्या ज्योती । तुका ह्मणे नळगे वाती.

(२८४) कस्तूरीचें रूप अति हीन वर । माजी असे सार मोल तया ॥

आणीकही तैसीं चंदनांचीं झाडें । परिमळें वाढे मोल तयां ॥
काय रूपें असे परीस चांगला । धातु केली मोला वाढ तेणें ॥
फिरंगी आटितां नये बारा रुके । गुणें मोलें विके सहस्र वरी॥
तुका ह्मणे नाहीं जाती सर्वें काम। ज्याच्या मुखीं नाम तोचि धन्य.

(२८५) काय हातीं लागे भुसाचे कांडणीं।सत्यासी दाटण करुनि काय;

(२८६) काय वृंदावनें माहियेल गुळें । काय जिरें काळें उपचारिलें॥
तैसी अधमाची जातीच अधम । उपदेश श्रम करावा तो ॥
नकळे विंचासी कुरवाळीलें अंग । आपले ते रंग दावीतसे ॥
तुका ह्मणे नये पाकासी दगड । शूकरासी गोड जैसी विष्ठा.

(२८७) कावळ्याच्या गळां मुक्ताफळ माळा ।
तरी काय त्याला भूषण शोभे ॥
गजा लागीं केला कस्तूरीचा लेप ।
तिचें तो स्वरूप काय जाणे ॥
बकापुढें सांगे भावार्थ वचन ।
वाउगाचि सीण होय त्यासी.

(२८८) कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरीं ते चांग ॥
वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ॥
ऊंस बाहेरी कठिण काळा । माजी रसाचा जिव्हाळा ॥
मिठें रुचविलें अन्न । नये सतत कारण.

(२८९) कुंकवाची ठेवा ठेवी ।

(२९०) कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा.

(२९१) पतिव्रते आनंद मनीं । सिंदळ खोंचे व्यभिचार वचनीं ॥
जळो वर्म लागो आगी । शुद्धपण भलें जगीं ॥

सुख पुराणीं आचारशीला । दुःख वाटे अनर्गळा ॥
शूरा उल्हास अंगीं । गांढ्या मरण तें प्रसंगीं ॥
शुद्ध सोनें उजळे आगी । हीन काळें धांवे रंगीं ॥
तुका ह्मणे तोचि हिरा । घनघायें निवडे पुरा.

(२९२) पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाचि कोण तया ॥
ज्वरिलिया पुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी तेणें घ्यावी त्यांची.

(२९३) प्रीति नाहीं राया वर्जिली ते कांता । परी तिची सत्ता जगावरी.

(२९४)–प्रीतिविण भेटी रुचि नेदी ।

(२९५) पेरीं कडू जिरें मागे अमृतफळें । अर्का वृक्षा केळें कैसीं येतीं.

(२९६) पोहों नये कासे लावितो आणिका ।
ह्मणावें त्या मूर्खा काय आतां.

(२९७) मात्कनाच्यायोगें आळशावरी गंगास्नान काय जगा करूं नये ?
उभी कामधेनु मांगाचे अंगणीं। तिसी काय ब्राह्मणीं वंदूं नये ?
कोढियाचे हातें परिसें होय सोनें। अपवित्र ह्मणोन घेऊं नये ?
यातिहीन झाला गांवींचा मोकासी। त्याच्या वचनासी मानूं नये ?

(२९८) पतिव्रतेची कीर्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे॥
आमुचें तें आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणीं ॥
अंगें उणें त्याच्या बैसे टाळक्यांत ।
तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे.

(२९९) बरें झालियाचे अवघे सांगाती । वाईटाचे अंतीं कोणी नाहीं॥
नोहे मातापिता नोहे कांतासुत । इतरांची मात काय सांगो ॥
तुका ह्मणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी.

(३००) मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास। असे ज्याचा त्यास नसे ठावा॥
भाग्यवंत घेती वेंचूनियां मोलें। भारवाही मेले वाहतां वोझें.
(३०१) मुसळाचें धनु नव्हे हो सर्वथा। पाषाण पिळितां रस कैंचा॥
वांझे बाळा जैसें दुध नाहीं स्तनीं।गारा त्या अधणीं न शिजती.
(३०२) समर्थासी नाहीं उपकार स्मरण। दिल्या आठवण वांचोनियां.
(३०३) साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठी। तयासी शेवटीं करबाडें॥
मालाचें पैं पेटे वाहताती उंटें। तयालागीं कांटे भक्षावया.
(३०४) सेवकें करावें सांगितलें काम। सिक्याचा तो धर्म स्वामी राखे.
(३०५) सर्प पोसूनियां दुधाचाही नास। केलें थिता विष अमृताचें.
३०६) सोइरे धाइरे दिल्या घेतल्याचे। अंत हें काळींचें नाहीं कोणी.
(३०७) समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा। भगिनी ते रमा शंखाचिया॥
मेहुणा जयाचा द्वारकेचा हरि। शंख दारोदारीं भीक मागे.
(३०८) सिलंगणीचें सोनें। त्यासी गाहाण ठेवि कोण.
(३०९) सिंहा पुढें काय जंबूक आरोळी। मोतियांचे ओळी कांच काय?
कापुरासि काय लावूनि उटावें। काय ओवाळावें दीपकासी?
(३१०) आंधळ्याचे काठी लागले आंधळे। घात एका वेळे पुढें मागें.
(३११) आपणा लागे काम वाण्याघरीं गुळ।
त्याचे याति कुळ काय कीजे॥
उकरड्यावरी वाढली तुळसी।
टाकावी ते कैसी ठायागुणें॥
गाईचा जो भक्ष अमंगळ खाय।
तीचें दुध काय सेवूं नये॥

तुका ह्मणे काय सलपटासी काज ।
फणसांतील बीज काढुनि घ्यावें.

(३१२) आपणा कळेना आपले अवगुण ।
पुढिलाचे दोष गुण वाखाणिती.

(३१३) आपटा संवदडचारा । दसऱ्याचा होय तुरा ॥
मृत्तिकेची ते घागरी । पाण्यासाठीं बैसे शिरीं.

(३१४) जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे.

(३१५) वाचोनि पढोनि जाले शहाणे । ह्मणती आह्मी संत ।
परनारी देखोनि त्यांचें । चंचळ जालें चित्त ॥
टिळा टोपी घालुनि माळा । ह्मणती आह्मी साधु ।
दया धर्म चित्तीं नाहीं । ते जाणावे भोंदु ॥
कलियुगीं घरोघरीं । संत झाले फार ।
वीतभरी पोटासाठीं । हिंडती दारोदार.

जनाबाई.

(१) गंगा गेली सिंधुपासीं । त्याणें अव्हेरिलें तिसी ।
तरि तें सांगावें कोणाला ?

(२) ज्याचा सखा हरि । त्यावरि विश्व कृपाकरी.

(३) चोरासंगतीनें गेला । वाटे जातां नागवला.

(४) अग्नीसवें खेळे । न जळला तरी पोळे.

नामदेव.

(१) देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं माझा भावो.

(२) खेळखेळेपरि डाईं न सांपडे । तो एक खेळिया शहाणारे.

(३)–गुरुविण वर्म हाता नये.

(४) मुखीं नाम हातीं टाळी ।

(५) पितयाचें भाग्य पुत्रासी नये कदा.

मुक्ताबाई.

(१) घरीं कामधेनु, ताक मागूं जाय ।

(२) परिसा झांकण घातलें खापर । नाहीं झालें जाण बावनकशी.

(३) अमृत टाकोनि कांजीची आवडी ।

(४) खरासी अखंड गंगेचें हो स्नान । गेलें वाया जीवन.

(५) उंसाचे शेजारीं एरंडाचीं झोंड । नाहीं त्याचे पाडें गोडी त्यांला.

(६) दुःखाचे शेवटीं सुख आलें भेटी । भेटलिया पाठीं तेंही गेलें.

रामदास.

अभंग.

(१) सांभाळी तो काय प्रारब्धा वेगळें। होणार नटळे ब्रह्मां दीकां.

(२) ज्ञानावीण सर्व व्यर्थचि जाणावें.

(३) आह्मी पोटाचे पाईक । आह्मां नलगे आणीक.
आह्मी खाऊं ज्याची रोटी। त्याची कीर्ती करूं मोठी.

(४) आलें भगवंताच्या मना । तेथें कोणाचें चालेना.

(५) रामदास ह्मणे भावें । जैसें द्यावें तैसें घ्यावें.

(६) जैसा भाव असे जेथें । तैसा देव वसे तेथें.

(७) कामधेनू मोकलीली । घरीं गाढवी बांधिली ॥
उपडूनी कल्पतरू। केला शेराचा आदरू ॥
सांडुनियां चिंतामणी । वेंची धइवराचें पाणी ॥
गेलें हातींचें निधान । केलें कवडीचें साधन ॥
परिसा रागें हुंडारिला । हातीं पाषाण घेतला ॥
सार अमृत सांडिलें । दैन्य वाणें कांजी प्याले ॥
सोनें सांडुनी आदरें । वेंचूं लागला खापरें ॥
रत्न सांडुनीयां खडे । गेले ह्मणुन दुःखें रडे ॥
केली साखर परती । सुखें तोंडीं घाली माती.

(८) कार्यकर्ता कीर्तिवंत । त्यासि जाणती समस्त ॥
कार्यकर्ता तो झांकेना । वेध लावी विश्वजना.

(९) कष्टें उदंड आटोपावें । तरि मग पुढें सुखी व्हावें.

(१०) सारासार निवडावे । तैसें जाणोनीयां घ्यावें.

(११) · · जीव जीवाचा आहार.

(१२) बोला सारिखें चालणें ।

(१३) सेवकाचा साभिमान । समर्थाचें हें लक्षण.

(१४) चंदना संगति चंदनचि होती । होय काळी माती कस्तुरीका॥
कस्तुरीका होय कस्तुरीच्या योगें । साधुच्यानि संगें साधुजन.

(१५) दुर्जन संगति कदां धरूं नये । घडती अपाये बहुविध ॥
बहुविध झाले अपाय बहुतां । तेंचि सांगों आतां सावकाश॥
कुसंग हे माया धरितां संगती । गेले अधोगती नेणो किती ॥
चांडाळा संगती होईजे चांडाळ । होय पुण्यशीळ साधुसंगें ॥
कुरुंदा संगती झिजला चंदन । कुसंगें जीवन नासतसे ॥
खाराचे संगती नासे मुक्ताफळ । होतसे तात्काळ कळाहीन ॥
लाखेच्या संगती सोनें होय उणें । दुग्ध हें लवणें नासतसे ॥
दुर्जन संगती सज्जन ढांसळे । क्रोध हा मबळे अकस्मात ॥
दास ह्मणे संग त्याग दुर्जनाचा । धरा सज्जनाचा आदरेंसी ।

(१६) जिवलग जीव घेती । तेथें परावे रक्षिती.

(अ.१६) साधुसंगें साधु भोंदुसंगें भोंदु । वादुसंगें वादु होत असे॥
होत असे लाभ भल्याचे संगती ॥ जाय अधोगती दुष्टसंगें ॥
दुष्टसंगें नष्ट झाला महापापी । होतसे निःपापी साधुसंगें ॥
संग जया जैसा लाभ तया तैसा । होतसे अपैसा अनायासें.

(१७) ताकहि पांढरें दुधही पांढरें । चवी जेवणारें जाणिजेते.

(१८) कण सांडोनियां घेऊं नये भूस । गर्भेविण फणस घेऊं नये ॥
घेऊं नये नारिकेळाची नरोटी । सालपटें खोटीं डाळिंबाचीं ॥
डाळिंबाची त्वचा चवड उंसाचा । स्तंभ कर्दळीचा कामा नये.

(१९) वाउगें सांडोनि सार तेंचि घ्यावें । येर तें सांडावें मिथ्या भूत.

(२०) खोटें निवडितां खरें नाणें ठरे।

(२१) दृश्यहि दिसेना अंधासि पहातां । परि तया ज्ञाता ह्मणो नये ॥
वेगळेंची कळे क्षीर नीर हंसा । दास ह्मणे तैसा अनुभव.

(२२) दर्पणीं पहातां दिसे सर्व अंग । परि पृष्ठ भाग आढळेना ॥
आपुलीच पाठी आपणा न दिसे ।

(२३) अर्थाविण पाठ कासया करावें । व्यर्थचि मरावें घोकोनियां ॥
घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहें । अर्थरूप राहें देखोनियां ॥
देखोनियां अर्थ सार्थक करावें ।

(२४) एकदां जेवितां नव्हे समाधान। प्रतिदिनिं अन्न खाणें लागे.

(२५) निरर्थक तीर्थें निरर्थक व्रतें । दास ह्मणे जेथें ज्ञान नाहीं.

(२६) सुखाचे संगति सर्वही मिळती।दुःख होतां जाती निघोनियां ॥
निघोनियां जाती संकटाचे वेळे । सुख होतां मिळे समुदाय.

श्लोक.

(२७) जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें। जनीं वंद्यतें सर्व भावें करावें-

(२८) सदाचार हा थोर सोडूं नये तो ।
जगीं तोचि तो मानवी धन्य होतो.

(२९) देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी.

(३०) जनीं सर्वसूखी असा कोण आहे।
विचारी मना तूंचि शोधोनि पाहे.

(३१) महाथोर ते मृत्युपंथेंचि गेले.

(३२) मना मानसीं व्यर्थ चिंता वहातें।
अकस्मात होणार होऊनि जातें.

(३३) मना सर्वथा सत्य सोडूं नको रे।
मना सर्वथा मिथ्य मांडूं नकोरे ॥
मना सत्य तें सत्य वाचे वदावें।
मना मिथ्य तें मिथ्य सांडूनि द्यावें.

(३४) समर्थाचिया सेवका वक्र पाहे।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे?

(३५) जयाचेनि संगें समाधान भंगे।
अहंता अकस्मात येऊनि लागे ॥
तया संगतीची जनीं कोण गोडी

(३६) घरीं कामधेनू पुढें ताक मागे.

(३७) जनीं बोलण्यासारिखें चालु बापा.

(३८) फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे

(३९) क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.

(४०) विचारूनि बोले विवंचूनि चाले।
तयाचेनि संतप्त तेहि निवाले-
बरें शोधल्यावीण बोलों नये हो।
जनीं बोलणें शुद्ध नेमस्त राहो.

(४१) जया भावली भक्ति जे तेचि मोठी.

दासबोध.

ओंव्या.

(१) पूर्ण ग्रंथ पाहिल्यावीण । उगाच ठेवी जो दूषण ।
तो दुरात्मा दुरभिमान । मत्सर करी.

(२) अभिमानें ये मत्सर । मत्सरें ये तिरस्कार ।
पुढें क्रोधाचा विचार । प्रबळ बळें.

(३) जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा.

(४) सुवर्णाचें लोह कांहीं । सर्वथा होणार नाहीं.

(५)...कवीश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर..कींहे शब्दरत्नांचेसागर ।
नानाबुद्धीचे वैरागर । कीं हे बोलके चिंतामणी ।
...कीं हे कल्पनेचे कल्पतरू।कीं हे अमृताचे मेघ ओळले ।
कीं हे नवरसांचे वोघ लोटले...कीं हीं विवेकनिधीचीं भांडारें.

(६) नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन ॥
परंतु हा परोपकारीं झिजवून । कीर्तिरूपें उरवावा.

(७) गळ गिळितां सुख वाटे । ओढोनि घेतां घसा फाटे ॥

(८) आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें.

(९) कोठें दिसेना कल्पतरु । उदंड शेराचा विस्तारु ।
पाहतां नाहीं मैलागरू । बोरी बाभळी उदंड.

(१०) रायाचे सन्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता ।
तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे.

(११) बहु ऋषी बहुमत । वेगळाले.

(१२) बहु निवडितां निवडेना। एक निश्चय घडेना।
शास्त्रें भांडती पडेना। निश्चय ठायीं.

(१३) बहुत शास्त्रीं बहुत भेद। मतां मतांसि विरोध.

(१४) अवघे आंधळेच मिळाले। तेथें डोळसाचें काय चाले ?

(१५) भोळा भाव सिद्धीस जाव। हा उद्धाराचा उपाव.

(१६) देउळावरी बैसला काक। तरी तो देवाहून अधिक।
ह्मणों नये.

(१७) विचार पाहील तो पुरुषू। विचार न पाहे तो पशू.

(१८) अंतरीं रोग वरी उपचार। काय करी ?

(१९) प्रपंचीं पाहिजे सुवर्ण। परमार्थीं पंचीकरण.

(२०) सारगार एकचि सरी। तेथें परीक्षेस कैंची उरी।
या कारणें चतुरीं। परीक्षा करावी.

(२१) देऊं नये तेंचि घ्यावें। घेऊं नये तें सांडावें.
उंच नीच ओळखावें। या नांव ज्ञान.

(२२) दोष देखोन झांकावे। अवगुण अखंड न बोलावे.

(२३) अतिवाद न करावा। कोणी एकासी.

(२४) दुःख दुसऱ्याचें जाणावें। ऐकोन तरी वांटोन घ्यावें।
बरें वाईट सोसावें। समुदायाचें.

(२५) अपार असावें पाठांतर। सन्निध असावा विचार।
सर्वदा सर्व तत्पर। परोपकारासी.

(२६) जो बहुतांचें सोसीना। त्यास बहुत लोक मिळेना।
बहुत सोसतां उरेना। महत्व आपुलें.

(२७) परपीडेवरी नसावें । अंतःकरण.
(२८) बोलतो खरें चालतो खरें।त्यास मिळती लहान थोरें.
(२९) जंववरी चंदन झिजेना । तंववरी तो सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती.
(३०) राजी राखावें सकळांला । कठिण आहे.
(३१) पेरिलें तें उगवतें । उसणें द्यावें घ्यावें लागतें ।
वर्म काढितां भंगतें । परांतर.
(३२) उत्तरा सारिखें आलें । प्रत्युत्तर.
(३३) विद्या उदंडचि शिकला । प्रसंगमान चुकतचि गेला ।
मग तये विद्येला । कोण पुसे.
(३४) श्वान बांधिलें तरी भुंके । तैसा स्वार्थ मूळें थिंके[1] ।
(३५) सन्मार्गी जगास मिळाला । ह्मणजे जगदीश बोळला.
(३६) नाना ऋषी नानामतें । पाहों जातां असंख्यातें.
(३७) जो बहुतांचे बोली लागला । तो नेमस्त जाणावा बुडाला.
(३८) बोलणें एक चालणें एक । त्याचें नांव हीन विवेक.
(३९) मज नाहीं तुज साजेना । खात्यास न खातें देखों शकेना.
(४०) व्युत्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा.
(४१) कीर्ति करून नाहीं मेले । ते उगेचि आले आणि गेले.
(४२) जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ।
तरी महंतलीला स्वभावें । अंगीं बाणे.
(४३) वर्तल्याविण बोलावें । ते शब्द मिथ्या.
(४४) कीर्ति पाहूं जातां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं.

---

१ तडफडतो.

मूर्खांचीं लक्षणें.

(४५) जन्मला जयाचे उदरीं । तयासीं जो विरोध करी ।
सखी मानिली अंतुरी । तो एक मूर्ख.

(४६) सांगे अंतरीची मात । तो०

(४७) परस्त्रियेसीं प्रेम धरी । श्वशुरगृहीं वास करी ।
कुळेंविण कन्या वरी । तो०

(४८) समर्थावरी अहंता । अंतरीं मानी समता ।
सामर्थ्येंविण करी सत्ता । तो०

(४९) आपली आपण करी स्तुति । स्वदेशीं भोगी विपत्ति ।
सांगे वडिलांची कीर्ति । तो०

(५०) अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी ।
जो बहुतांचा वैरी । तो०

(५१) आपुलीं धरूनियां दूरी । पराव्यांसी मैत्री करी ।
परन्यून बोले रात्रीं । तो०

(५२) बहुत जागते जन । तयांमध्यें करी शयन ।
परस्थळीं बहुभोजन । करी तो०

(५३) मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न । तो०

(५४) धरूनि परावी आस । प्रयत्न सांडी सावकाश ।
निसुगाईचा संतोष । मानी तो०

(५५) घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे ।
शब्द बोलतां निर्बुजे । तो०

(५६) नायके त्यास शिकवी। वडीलांसि जाणीव दावी। तो०

(५७) आपणाहून जो श्रेष्ठ। तयासि अत्यंत निकट।
शिकवणीचा मानी वीट। तो०

(५८) वोळखीविण संग धरी। तो०

(५९) आपणासि जेथें मान। तेथें अखंड करी गमन।
रक्षूं नेणे मानाभिमान। तो०

(६०) सेवक जाहला लक्ष्मीवंत। तयाचा होय अंकित। तो०

(६१) दंडी अपराधाविण। स्वल्पासाठीं जो कृपण। तो०

(६२) घरींच्यावरी खाय दाढा। बाहेर दीन बापुडा। तो०

(६३) नीच यातीसिं संगत। परांगनेसिं एकांत॥
मार्गीं जाय खात खात। तो०

(६४) स्वयें नेणें परोपकार। उपकाराचा अनुपकार।
करी थोडें बोले फार। तो०

(६५) विद्या वैभव ना धन। पुरुषार्थ सामर्थ्य ना मान।
कोरडाच वाहे अभिमान। तो०

(६६) उंचीं जाऊनि वस्त्र नेसे। चौबारां बाहेरि बैसे। तो०

(६७) जयासि नाहीं दृढ बुद्धि। तो०

(६८) जिवलगासी परम खेदी। सुखाचा शब्द तोही नेदी।
नीच जनांसी वंदी। तो०

(६९) शरणागतासी अव्हेरी। लक्ष्मीचा भरंवसा धरी। तो०

(७०) पुत्र कलत्र आणि दारा । इतुकाच मानूनियां थारा ।
विसरोन गेला ईश्वरा । तो०
(७१) दुर्जनाचेनि बोलें । मर्यादा सांडोनि चाले ।
दिवसा झांकिले डोळे । तो०
(७२) आदरेंविण बोलणें । न पुसतां साक्ष देणें ।
निंद्य वस्तु अंगीकारणें । तो०
(७३) उंच स्थानीं जाऊनि बैसे । जो गोत्रजांसी विश्वासे । तो ०
(७४) दोघे बोलत असती जेथें । तिसरा जाऊन बैसे तेथें ।
डोई खाजवी दोहीं हातें ॥ तो०
(७५)उदकामध्यें सांडी गुरळी । पायें पाय खांजोळी ।
सेवा करी हीन कुळीं । तो०
(७६) परस्त्रीशीं कलह करी । मूर्खाची संगत धरी । तो०
(७७) कलह पाहत उभा राहे । सोडवीना कौतुक पाहे ।
खरें असतां खोटें साहे । तो एक मूर्ख.
(७८) लक्ष्मी आलियावरी । जो मागील ओळखी नधरी । तो०
(७९) आपण वाचीना कधीं । कोणासि वाचाया नेदी ।
पुस्तक बांधोनि ठेवी बंदीं । तो०

उत्तम लक्षणें.

(८०) वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखिल्याविण खाऊं नये । सांपडली वस्तु घेऊं नये । एकाएकीं.

(८१) अतिवाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता.

(८२) विचारेंविण बोलूं नये । मर्यादेविण हालूं नये ।
विवेचनेंविण चालूं नये । कांहीं केल्या.

(८३) प्रीतीविण रुसूं नये । चोरासि ओळखी पुसूं नये ।
रात्रीं पंथ क्रमूं नये । एकाएकीं.

(८४) जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं.

(८५) वक्तयास खंडूं नये । ऐक्यतेसि फोडूं नये ।
विद्याभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या.

(८६) तोंडाळासि भांडूं नये । वाचाळासि तंडूं नये ।
संतसंग खंडूं नये.

(८७) केल्याविण सांगूं नये । आपुला पराक्रम.

(८८) चहाडी मनासि आणूं नये । शोधल्याविण करूं नये ।
कार्य कांहीं.

(८९) सुखा अंग देऊं नये । प्रयत्न पुरुषें सांडूं नये ।
कष्ट करितां त्रासूं नये । निरंतर.

(९०) कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखूं नये.

(९१) जाणारासी पुसूं नये । कोठें जातोसि ह्मणोनी.

(९२) पराधीन होऊं नये । आपलें ओझें घालूं नये ।
कोणाएकासी.

(९३) हीनाचें ऋण घेऊं नये । ग्वाहीविण जाऊं नये । राजद्वारीं.

(९४) आपुल्याची ग्वाही देऊं नये। आपुली कीर्ति वर्णूं नये।
आपुलें आपण हांसूं नये। गोष्टी सांगोनी.

(९५) बहुतेकांशीं करूं नये। मैत्री कदा.

(९६) अल्पधनें माजूं नये। मूर्खासि संबंध पाडूं नये।
अंधारीं हात घालूं नये.

(९७) भलते भरीं भरूं नये। विचाराविण.

(९८) सत्य मार्ग सोडूं नये। असत्य पंथें जाऊं नये।
कदा अभिमान घेऊं नये। असत्याचा.

(९९) अपकीर्ति सांडावी। सत्कीर्ति वाढवावी।
विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची.

(१००) दोष ठेवी पुढिलांसी। तेंचि स्वयें आपणापासीं।
ऐसें कळेना जयासी। तो एक पढतमूर्ख.

(१०१) यथार्थ सांडूनि वचन। जो रक्षून बोले मन।
ज्याचें जिणें पराधीन। तो एक पढतमूर्ख.

(१०२) पेरिलें उगवतें। बोलण्यासारखें उत्तर येतें।
तरी मग कर्कश बोलावें तें। काय निमित्त?

(१०३) क्रियेविण शब्दज्ञान। तेंचि श्वानाचें वमन.

(१०४) बोलण्यासारखें चालणें। स्वयें करून बोलणें।
तयांचीं वचनें प्रमाणें। मानिती जनीं.

(१०५) जें जनासी मानेना। तें जनही मानीना.

(१०६) नित्य नेम सांडूं नये। अभ्यास बुडों देऊं नये।
परतंत्र होऊं नये। कांहीं केल्या.

(१०७) लोकनिंद्य तें करूं नये.

(१०८) कळल्याविण बोलूं नये। अनुमानें निश्चय करूं नये.

(१०९) प्रयत्नेंविण राहों नये। आळस दृष्टीस आणूं नये.

(११०) ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा।
ओं भवती या पक्षा। रक्षिलें पाहिजे.

(१११) आवडीविण वक्तृत्व। कंटाळवाणें.

(११२) एकाची कीर्ति एकापुढें। वर्णितां साहित्य न पडे।
ह्मणोनियां पवाडे। जेथील तेथें.

(११३) श्रीहरि वांचून जे कळा। ते जाणावी अवकळा.

(११४) अवगुण सोडितां जाती। उत्तम गुण अभ्यासितां येती।
कुविद्या सांडूनि अभ्यासिती। शाहणे विद्या.

(११५) मूर्खपण सांडितां जातें। शहाणपण शिकतां येतें।
कारभार करितां उमजतें। सकळ कांहीं.

(११६) तनें मनें झिजावें। तेणें भलें ह्मणोन घ्यावें।
उगेंचि कल्पितां सिणावें। वाउगें जनीं.

(११७) दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें। लागेल स्वयें.

(११८) शाहणे करावे जन। पतित करावे पावन।
सृष्टी मध्यें भगवद्भजन। वाढवावें.

(११९) एक भरतें एक रितें। रितें मागुतें भरतें।
भरतें तेंहि रितें। काळांतरीं.

(१२०) कष्टेंविण फळ नाहीं। कष्टेंविण राज्य नाहीं।
केल्याविण होत नाहीं। साध्य जनीं.

(१२१) आळसें काम नासतें । हें तो प्रत्ययास येतें ।
कष्टाकडे चुकवितें । हीन जन.

(१२२) आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ।
आधीं आळसें सुखावती । त्यासि पुढें दुःख.

(१२३) जिहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन.

(१२४) काया बहुत कष्टावी । उत्कट कीर्ति उरवावी ।
चटक लावून सोडावी । कांहीं एक.

(१२५) झिजल्यावांचून कीर्त्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची ।
जिकडे तिकडे होते छी छी । अवलक्षणें.

(१२६) जें जें कांहीं आपणास ठावें । तें तें हळु हळु शिकवावें ।
शाहाणें करूनी सोडावें । सकळ जनां.

मुक्तेश्वर.

रामायण.

(१) .. ..जाणवे जाणत्यातें.

(२) सिंधूचा घोष गाजे तंववरि न दिसे जोंवरी कुंभजाचा.

(३) कट्टा रसादे शिवतांचि हातीं । सुस्वाद कैंचा फळ-भक्षणांतीं.

(४) बुडे सागरीं सांग कैसा अगस्ती.

(५) जळीं दर्दुरा नावडे पद्मगंधू । मुखीं मद्यपा काय नेमील वेदू.

(६) .. .. जगीं पाजळी कीर्त्ति-सौभाग्य दीपा.

(७) विफळ-वचन-जाळीं वर्णिजे तेंचि थोडें ।
अनुभव-सुख ज्याचें तोचि जाणें निवाडें.

(८) सदयपण जयाचें वर्णितां मौन वाचे.

(९) विस्मयासि नसे स्थाना बहुरत्ना वसुंधरा.

(१०) दिसे मोद तो हेतु खेदासि होय ।
चढे तें पडे येथ आश्चर्य काय ॥
नको जाकळों लोकनिंदा विवर्ती ।
जगीं सत्य नाचेल निर्दोष कीर्ति.

(११) परामर्ष राजा प्रजेचा करीना । विचारूनियां दुःख त्यांचें हरीना॥
अधःपात हो वेद त्यालागिं बोले.

(१२) .. .. निजनेमा रक्षिजे बुद्धिवंतीं.

(१३) .. .. नसे यत्न तो काळ सत्तेसि कांहीं.

(१४) .. .. अहा सत्य संरक्षिजे प्राणमोलें.

(१५) त्यागें वधें खेद समान श्रेष्टा ।

सुभानंतस्वामी.

(१) मान्य पुरुषातें मरणाहुन । दुष्कीर्ति वाईट बोलती.

(२) कीं जेजें श्रेष्ठ आचरती । तें तें इतर जनही करिती ।
ते जो कां निर्णय करूनि दाविती । वर्तती ते रीती हे लोक.

(३) भलता स्वधर्म जो असेल तो बरा । परधर्म ऱ्याहूनि निर्धारा ।
स्वधर्मी मृत्युहि श्रेय जाण खरा । परधर्म सत्वरा करी भय.

(४) .. .. कर्माच्या गती गहन पैं.

(५) एक काळ एक कृतांत ।

(६) .. .. सत्यापासीं जनार्दन.

(७) होणार गती तैसेंचि होईल निश्चिती । त्या सारिखी सुचे युक्ती ।
आपुलिये सुमती कारणें.

(८) .. .. यथार्थ बोलतां घडती अपाय बहुत ।
परी सत्य न सोडीं मी निश्चित.

मोरोपंत.

आदिपर्व.

(१) जाइल कवण यमाच्या जोडूनि बळेंचि हात पाशापें[1] ?
(२) जागें काय करावें निपट कपटनिद्रिता जना अन्यें ?
(३) जें अज्ञपणीं घडलें अघ आणावें मनांत न (यमा) तें.
(४) जों जों दुर्लभ तों तों सस्पृह चित्तेच्छु होतसे वित्तीं.
(५) जेथें बळगुण तो गुरु शूर बळा मानिती न कुलशीला.
गुणहीन शाल्मलि वृथा लघु न ह्मणति भजति साधु तुळशीला.
(६) जपति जसे पाडाया व्यसनीं सुजनासि सर्वकाळ विटे[2].
(७) ज्यांत सदन्नें जेवी भंगी हाणोनि दुष्ट लत्ता तें
न कृतघ्न उपेक्षावा शीघ्र वधावें अशा प्रमत्तातें.
(८) .. .. जो धर्मज्ञ शुद्ध कुळ ज्याचें
तो अन्याय करीना. धर्मीच मन प्रसन्न कुळजाचें.
(९) (तार्क्ष्य[3] ह्मणे) आत्ममुखें न करिति आत्मप्रशंसन ज्ञानी.
(१०) .. .. त्यजुनि सुधा कोण सेवितो कांजी ?
(११) त्यांत पळहि न वसावें ज्यांत दुरितभीति धर्म नय नाहीं.
तृणचरमुखें सुखें अवलोकावीं खळमुखें न नयनांहीं.
(१२) त्यजितील पंचभूतें स्वगुणांसि, रवी छवीस सोडील,
शीतत्वातें चंद्रहि, शक्रहि करविक्रमासि तोडील;
उष्णत्व त्यजिल दहन, मर्यादेतेंहि सिंधु सोडील,

---

१ पाशा जवळ. २ जार. ३ गरुड.

धर्मपर धर्मराजहि, सद्धर्म प्रीतिलाहि तोडील;
परि हा शांतनव तुझा सुत केवळ कृपण मान सत्य जितां
मेल्याहि न टांकील प्राणासि न भीत मानस त्यजितां.

(१३) तरती मनोरथांतें निजधर्माची धरोनि जन कास.
धर्मे करूनि भजतां होइल हे विषलताहि सोमलता;
त्यजितां धर्म पथांतें धरिते पीयूषवल्ली सोमलता.

(१४) तज्ज्ञातज्ञपरीक्षेमाजि[1] पळहि घृतपणें न तेल टिके.

(१५) थोरांसि नावडे श्रित- साधुत्यागें घडेल कुत्सा हें.

(१६) पावेलचि भंगातें प्रभुहि जरि धरील पक्ष सदरींचा[2].

(१७) पूजा कैंची लोकीं जरि दगड शिरीं धरी न शेंदूर.

(१८) परिन कथितां भल्याला ह्त्ताप उणा न होय. .. ..

(१९) पिकतें मौक्तिक मुक्ता-शुक्तींतचि, तें न अन्यशुक्तींत.
प्रसवे व्याघ्रास मृगी? काय उकिरड्यांतही हिरा पिकतो?
जरि वाढला कुलींही काकाच्या काक कायरे पिक[3] तो?

(२०) शशिरंकु पुढें कैसे होतील न भग्नगर्व काळविट ?

(२१) श्येन कसा जिंकावा पक्षित्वमदें करूनि मशकांहीं.

(२२) शठमित्र मंत्रपान प्राज्ञमतें परम विषम रायाला
हें घडतां नलगेचि प्राशावें इतर विष मरायाला.
शिष्ट म्हणति दिष्टें[4] खरें सुख दुःखद विष्टपीं[5] जसें इष्ट
किंवा अनिष्ट करितें मित्र तसें अन्य कल्पन क्लिष्ट.

---

१ तत्-ज्ञ अतत्-ज्ञ परीक्षा. २ बलाढ्य शत्रूंचा. ३ कोकिळ. ४ दैव. ५ जगांत.

(२३) दैवेंचि खळ वळे हें तत्व प्राकृत दक्ष कानांहीं
(२३ अ.) .. .. दैव अन्यथा घडवी.
(२४) दुर्जनसहवास सदा तापद हा काय नरक सामान्य?
होईल यासि दाटुनि मानधन प्राज्ञ नर कसा मान्य?
२५) दैव प्रसन्न नसतां वस्तुसकल भेदिल्याचि परि पळतें.
(२६) (भूप म्हणे) बाळ दिसे परि मतिनें वृद्धसा, न बाळकसा;
वय अल्प परि अनल्पज्ञान; ह्मणावा असाहि बाळ कसा?
(२७) ब्राह्मण कणसे खुपती तुमच्या नेत्रीं न सोसवे काढा;
युक्तचि मरणाराला हितपरिणामहि न सोसवे काढा.
(२८) बहुतप करिता तापस धन्य नव्हे धन्य करिल जो जतन.
(२९) बापा कांट्यानेंचि प्राज्ञ सुखें काढितात कांटा कीं.
(३०) ... . असमंजसकर्म सन्मतिस खातें.
(३१) अज्ञ मुलें कलह करिति, न वदावें तेंचि बोलति स्वैर;
तें चित्तांत धरुनियां प्राज्ञें पुरुषें करूं नये वैर.
(३२) असतां विधिकवच नव्हे काळाच्याही विनाश कुंतांनीं[१].
(३३) आण तुझी जाण खरें केला निश्चय नव्हेचि हा लटिका.
(३४) आर्य प्रसन्न होती नुसत्याहि हितोक्तिच्या उदारपणें.
(३५) आहेत कोश हातीं लोकांचें रंजवीन मन दानें.
विश्ववशीकरणाचा घ्यावा नलगेचि मंत्र धनदानें.
(३६) आकळिला मृगमद जरि बहुयत्नें वास काय आकळतो?

१ भाल्यांनीं.

लोपे कवि न कुवासें[1] पावे ख्यातीस मंद न सुवासें;
कळतोचि जाणत्याला सर्व तरुश्रेष्ठ चंदन सुवासें.

(३७) या क्रोधदस्यु[2] तिलकें कोण तपोधन जगीं नसे लुटिला?

(३८) [भीष्म ह्मणे] कुलधर्म त्याग नव्हे उचित(मान्य मज आहे).
सत्कुलजांचेंचि सदा स्वकुलाचाराकडेचि मन वाहे.

(३९) कामेंचि बुडविलें जग हें ऐकावेंहि न व्यसन कानें.
इतर किति पाविजेलचि विषयें भय नित्य नव्य सनकानें.

(४०) [कां राज्य वृथा देसी] कोण्हासहि यश दिल्हें न दायादें.

(४१) .. .. कटुहि सदुपदेश हित जसे काढे

(४२) गुप्त करो सदसत्कृत तत्काळ दहाजणांत अटकळतें.

(४३) .. .. पंकीं पडला करील काय कैरी[3]?

(४४) टाकूनि सार सुज्ञा गोळा करितोस काय गाबाळ ?

(४५) .. .. मळवावें पंडितें न यश, हाणी
प्राणाचीहि बरी परि न यशाची. (सांगती नय शहाणीं).

(४६) मारक कळतां घ्यावी उग्रविषाची बळेंचि कां गोळी ?

(४७) मित्र सधन सधनाचें साजे गोदुग्ध मित्र गोदुग्धा.

(४८) मूर्ख भलतेंचि करिती सज्जनही आवडे न भांडखळा.

(४९) व्यसनीं बुडवूं पाहति खळ ज्या त्या सज्जनासि हरपावे.

(५०) विश्वास खलीं न बरा सावध व्हा भय घडे अनवधानें[4].

---

१ वाईट वस्त्रांनें. २ क्रोध हाच कोणी श्रेष्ठ चोर त्यानें. ३ हत्ती.
४ गैरसावधपणानें.

(५१) विद्वत्वें सधनत्वें तुल्यें लोकांत मान सख्यातें.
झालें जीर्ण विसर जें[1] कोण तया मंदनायका पुसतो.
गतरंग सुगंध जुना पावे सन्मान काय कापुस तो ?
(५२) विस्तर भय दे नाहीं तरि काळाचेंहि भय नसे गातां.
(५३) वरि गारसा हिरा, परि त्या कवचें तेज काय हो मळतें ?
(५४) व्हावें क्रमेंचि धर्म्य–व्यवहारीं धरुं नयेचि भीड नतें.
(५५) भलत्यासींच नृपसुतें द्वंद्व करुनि शस्त्र यश न मळवावें.
(५६) भूपसखा भूपाचा कवि कविचा धनिक तोचि धनिकाचा.
(५७) निद्राभंग बरा परि न बरा आवश्यक क्रियालोप.
(५८) न करुनि विचार वदतां पडतें शोकांत मानस ख्यातें.
(५९) संसर्गीही भोगिति दोषीच न दोष आपुले भोगी.
(६०) सुज्ञें ताप सहावा द्यावा तापप्रदासिहि न ताप.
(६१) साधु कृतोपद्रवही प्रतिकूळ न होति ते जनां तरुसे.
(६२) सर्वस्व वेंचिलें परि एक भलेपण जगांत वांचविलें.
(६३) सन्माणिक्य मणिपुढें गोमेदाचा फिका पडे रंग.
(६४) सर्वत्र जिष्णु[3] गुरुसा त्या गुरुशिष्यांत एकमात्र उणें–
वृद्धत्व क्षत्रत्व त्यजुनि पहातां समान सर्व गुणें.
(६५) .. .. सुविद्य नता न कां पावे.
(६६) सुज्ञांसि झांकिलेही कळति गुणख्यात मृगमदासम जे.
(६७) सेवि तया वृद्धाचें मंत्रित हित हित तसें न तरुणाचें.
(६८) सर्पा अर्पावें जें विषपण येतें तया पया सुरसा.

---

१ सख्य. २ प्रसिद्धपणें. ३ अर्जुन.

सभापर्व.

(६९) अप्रिय परि पथ्य असे वक्ता श्रोताहि दुर्लभ स्पष्ट;
बहु सुलभ प्रियवदते वाढविती चुकविती न ते कष्ट ?
(७०) कीं समयीं न वदावी तरि मग केव्हां सदुक्ति बोलावी ?
(७१) किमपि न वदला बहुधा समयीं समयज्ञ मौन्यही धरितो.
(७२) गीष्पति[1] पुढें मिरवितो साऽक्षरता[2] दाखवूनि गाबाळ.
(७३) चार व्यसनें मृगया स्त्री पान द्यूत यांत जो सक्त
तो धर्मच्युत; तत्कृत सत्कृत न महाजनांत हें व्यक्त.
(७४) ज्याचें आचरण जसें त्या तैसा फलद काळजीवा हो.
(७५) ज्वरिता जसें ससित पय सद्वचन न दुर्जना तसें चव दे.
(७६) देतो सभेंत लघुता जो स्वविषयीं बळेंचि बोल निघे.
(७७) धरिति शिवेच्छु[3] क्षत्रिय– जन जिकाया परा शरालीला[4];
संत क्षमेसि धरिती.
व्याघ्रवृक[5]–हरि[6]–व्याळ[7]-प्रभृतींचा जो समूह हानिकर
त्याहूनि काम–कोप- प्रमुखांचा निपट दुष्ट हा निकर.
बा सादर अभयाच्या तापस दानींच हानि करवि खरी
धृतिला धुळींत नेउनि ताप सदा नीच हानिकर विखरी.
जी शीतां[8] गाधजळा[9] सरितां[10] शिरतां निवे करी[11] तींत;
निवतो प्रवेशतां जन सर्वहि तैसा विवेकरीतींत.

---

१ बृहस्पति २ विद्वत्ता. ३ कल्याण इच्छिणारे. ४ बाणांच्या पंक्तीला. ५ लांडगे. ६ सिंह. ७ सर्प ८ थंड. ९ जिचें पाणी खोल आहे अशी. १० नदी. ११ हत्ती.

नाशी स्वसेवनकरा अन्यजनां ही ह्मणोन कोपानें
बहु अहित होय, तैसें अहित विषाच्या ह्मणों नको पानें.
× × ×
कोपकुळजें जरि तमें तरि फुगउनि गल्ल भानु गांठावा
महिमा क्षमारताचा बहु तो श्रीवल्लभानुगां गावा.
(७८) आर्तें[1] वैद्यगृहाला गुण यो कीं प्राक्तनें न यो जावें.
(७९) .. .. न कुनेत्रें जाय रूप, कुज्ञानें;
ज्ञानासि लोचनाहुनि फार जपावें ह्मणोनि सुज्ञानें.
(८०) .. .. प्रभुशीं हट करितां पाठिशीं कशा[2] लागे.
(८१) बळवान् वक्ता असतां होय अधर्महि सुधर्मसा (धन्ये);
दुर्बळ वक्ता असतां धर्महि होतो अधर्मसा (कन्ये).
(८२) (कृष्ण ह्मणे गा भीमा) मतिबळ बळ हेंचि मान्य सुकवीतें;
भुजबळ तें एखादे समयीं तत्काळ ओठ सुकवीतें.
(८३) मरणाऱ्या रोग्याला काय करिल जाणता भला वैद्य.
(८४) मधुतेंचि मूढ पाहे पहात नाहीं परि प्रपातातें[3].
(८५) राया कुलार्थ पुरुष, ग्रामार्थ कुळहि समस्त सोडावें;
ग्रामहि देशार्थ, मही आत्मार्थ; बुधें भलेंचि जोडावें.
(८६) ... .. मधुनें सारविला केवळ वरि मात्र गोड वाखरँची[4].
(८७) सुप्त व्याघ्रासि नको लावूं दाटूनि शृंग. .. .. ..
(८८) .. .. समर्थ न कोणीही सुज्ञ भावि टाळाया.

---

१ रोग्यानें. २ चाबूक. ३ पर्वताच्या कडयाला. ४ वस्त्रा.

(८९) संसर्गे भोगावें पुण्य जसें साधु हो तसें पाप.

(९०) छळकासि कवि न शापिति; देतें जड कनक काय हो गाळी?
पाळी जो त्याशि मधुर इक्षु तसा त्याहि अदय जो गाळी.

(९१) लाभ नसे ताप वसे ज्यामध्यें तो कुसंग सोडावा.

वनपर्व.

(१) अचल करींच असावा व्यवहारीं शब्द संगरीं सदसी[1].

(२) क्रोध असावा समयीं केवळ वश चित्त न क्षमेला हो.

(३) काय न दगड तपस्वी भिजला वृष्टींत तापला ऊनीं.

(४) .. .. कार्यपरें सर्वथा न लाजावें.

(५) कामा क्रोधा लोभा अनुसरतां लोक फार बा ठकले.
न करावा सद्वेष, स्वहिता देऊं नयेचि पाठ कले.

(६) कोणाहि कुळांत नसो निज बाळकघातहेतु म्हातारा.

(७) कृष्णा हांसोनि म्हणे भामे मोहावयाशि पतिला जे
मंत्राद्युपाय करणें या श्रवणें बहु मदीय मति लाजे.
प्रेमें पतिचरणांशि न देउनि दे हात तायिताला जे,
ते स्त्री न रुचे पतिला; कीं तीतें आततायितो[2] लाजे.
जाणें वशीकरण हें–करित्यें जेणें कधीं न कोपति तें;
सखि तूंहि असेंच करीं; मद मत्सर दाखवूं नको पतितें.

---

१ चांगलें खड्ग. २ घातकीपणा.

पतिपरमेश्वरचरणा जी तत्सेवार्थ न नवशी करणें
ती मुग्धा कैशी गे वळवील स्वामिमन वशीकरणें.

(८) .. .. गुरुधिक्कारेंकरूनि पाप डसे.

(९) घूकां दृष्टीस नको सर्व जगत्तोषहेतु परि सवितां.

(१०) खळबोधश्रम निष्फळ.

(११) जाणति न सांगतां सुख असुख परांचें जगीं सदा सम जे.

(१२) जयहेतु काय होइल अहिला बलयत्नकोटि केकि रणीं.
मिरवे प्रकाश तिमिरीं खद्योताचा, न तो टिके किरणीं.

(१३) जें कर्म धर्मशर्मद त्यासचि संपादितो भला देहें.

(१४) ज्या कर्मी योग्यत्व स्वामीचें तें न सेवकांनीं कीं.

(१५) .. .. दुर्बळीं न कोपावें.

(१६) दायादांचें दर्शन घ्यावें काशास ताप साधाया.

(१७) दे धेनु दुग्ध धांउनि वत्सा; इतरां तदर्थ बळ लागे.

(१८) शास्त्राभ्यास खरा गुरु समयीं रक्षी न मानसा चकवी.

(१९) शिरतां पाताळबिळीं दीपहि पावेल कां न रविमान?

(२०) (धर्म म्हणे रे भीमा) शरणागत रिपुहि रक्ष्य सन्महित.
बा जरि घडेल भीता भय दान जगीं तरींच जन्महित.
न सहावा अन्यकृत ज्ञातिपराभव बुधें उठा रचितो.
जन्मुनि सुयशासि न जो जननीयौवनवनीं कुठारचि तो.

१ घुबडाला. २ सूर्य.

(२१) व्यसनीं भल्यासि पाडी खळ, हरिणा व्याध जेविं पाशांत.

(२२) विद्या दुष्टीं भय दे.

(२३) व्यसनीं हरिहिबुड बळ न पहातां पाहिल्यासि अविहि तरे.

(२४) विस्तर भय नसतें तरि वर्णाया काय सुकविला परवा.

(२५) .. .. .. प्राणाहुनि रक्षिति सत्यव्रतामति ज्ञाते.

(२६) पूज्यासि दुःख सांगुनि अमृतनदनिमग्नसा निवे दीन.

(२७) परमापदेंतही मति धर्मींच रतो अशिक्षितचि देवा.
(ब्रह्मास्त्रहि स्फुरो हे) द्या गुरुजी साधुंची घडो सेवा.

(२८) ... ... पाडी भ्रांतींत पामरा मरण.

(२९) भावि कसें टाळावें लोकें प्रारब्ध कर्म त्वत्सारें.

(३०) ... . भल्याच्या त्दयीं परशोकवन्हि शौचि शिरे.

(३१) .. .. भोळ्या नरा वणिक दापी.

(३२) मातेचा अस्नेहहि होय यशोहेतु साधु रामाला.

(३३) मृत्यु असो परि वंचन करुनि सुधेच्या जिणें नको पानें.

(३४) मरण बरें यश ज्यांत श्रेष्ठ न त्याहूनि राज्य सामान्य.

(३५) बापाशिं बाप न म्हणे ऐशाला काय होय आजोबा.

(३६) बा गा धर्माच्या तों कोणी सोडूं नयेचि कासेतें.
निष्फळ होती मेघें त्यजिलीं आलींहि जीविका शेतें.
निजहितकर धर्माचें कुशलें विटवूं नयेचि मन कांहीं

---

१ सिंह. २ मेंढा. ३ तेज.

यापरि पोषण पालन लालन करिजे न अन्य जनकांहीं.
अंभोदास[1] पहाती जैशीं पसरूनि नित्य आशेतें,
धर्मासि तसीं भूतें; करि पूर्ण समर्थ हाचि आशेतें.
साधु म्हणति जो न करी धर्माशीं नीतिशीं विरोधा त्या
रक्षी व्यसनीं तदितर जन उदकीं लोष्टसा विरो धात्यां;
म्हणऊनि अनुसरावें सुज्ञें न क्रोधलोभकाममता.
पतनार्थ कां अहंता पोषावी गा तशीच कां ममता?

(३७) स्वपरयशोवृद्धि रुचे सुजनांस स्वपरकीर्तिहानि खळा.
(३८) संसार दों दिसांचा यश जोडी जो कुलीन तोचि तरे.
घ्यावें बरें ह्मणोनि स्वपरमुखें तें कुलीनतोचितें[3] रे.
आते साधु यशस्वी शस्त्रास्त्रज्ञ प्रसिद्ध वासवसे.
पद्मचि तेज्यांत सदा श्रीगुणगणरसयशःसुवास वसे.
(३९) सत्य प्रिय हित वदती शुद्धात्मे न धरितीच नव रीती.
(४०) .. .. साधूत्कर्षें असाधु कां मरती?
(४१) सत्संगीं न शिरे बा लवमात्रहि ताप; जेंवि न दँव सेरीं.
(४२) .. .. स्वगुण स्वमुखें वदों नये राजा!
(४३) सुयशोमृतासि पसरिति अमर न पसरील काय नर हावा.
(४४) सन्मति अपवादाभी करणीच्याहि न वधू तशि बिभ्याला.
(४५) सोशील मृत्यु परि गुरु शरणागतताप पळ न सोशील.
(४६) साधूत्कर्षासहनत्वें केव्हां कोणते न खळ मळले.
(४७) संत ह्मणति संततिहुनि संसारीं प्राज्य सार सत्या गीं.

१ ढेंकुळसा. २ ब्रह्मदेवा. ३ कुलीनतेला उचित. ४वणवा. ५सरोवरांत. ६वाणी.

(४८) हंसीं हंस बकीं बक मिसळे; जन ओढितो स्वजातिकडे.
(४९) हय्यंगवीन[1] जैसें सुरसिक रसनेंपुढें न तेल टिके.
(५०) हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं.
(५१) होतें सद्धर्माच्या कासेला लागतां सदा शिवें[2] हो.
(५२) लोकां महोत्सवमद तोचि सदा; त्यांसि पाडवा नलगे.
(५३) न बुडविति न वा तारिति चित्रें बरवींहि औंड[3]–नावांचीं.[4]
(५४) धर्मन्याय त्यजितां तेजस्वीही तमीं न रविहि तरे.
(५५) धर्मासि करि वरि लवे मात्र शिरें दुष्ट अंतरीं न मनें.

विराटपर्व.

(१) झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु; परंतु यासम हा.
(२) खळत्हृदय साधुवचनें दुखवे न सुतप्त लोहशंकुशतें.
(३) चुकतें भावि तरि सुखा सुज्ञ श्रीकांतदास कां मुकते?
(४) तारुनि परासि तरती हरिजन.
(५) टाकिति न बाह्यरंगें फळ नीरस ह्मणुनि निपुण पणसाचें.
(६) दुःसह कामविकार स्त्रीरत्नास्तव सुरा नरा होती.
(७) .. .. धीरा भुलवील काय तोकवचें[5]?
(८) धर्मन्यायोचित जें तेंचि सुभाषण मनासि उद्धवं[6] दे.
(९) न करील कां पित्याची दुर्गतिची माउली सुरा माती.
(१०) नेणें जनमन साक्षी विश्वाचा एक जाणतो शिव तें.

---

१ लोणी. २ कल्याण. ३ आडांचीं. ४ नौकांचीं. ५ बाळकाचें भाषण. ६ हर्ष.

(११) .. .. .. न जयें होय खळांच्या कधींहि सुख हितुलीं[1].
(१२) नीतींत तसें खळमन जोंवें नळींत श्वपुच्छ सामास.
(१३) .. .. प्रियहि जीवित वीरा.
(१४) प्राणरहितहो परि पळभरि मानरहित कधीं सुयोध नहो.
(१५) फारचि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच.
(१६) ... . बुडती तरि भजति नीच कायातें.
(१७) बोधीं बाहेर निका[2] होय परि नव्हे निका मनीं चपळ.
(१८) बहु कर्म करी पंडित कथनावसरींहि थोडकेंच वदे.
(१९) बुडत्येहि सदहितांच्या बहु थोरांचीहि कीर्ति सहवासें.
(२०) मेले दशाननादिक तरि वश होतात नीच कामातें.
(२१) मी प्रभु हें अज्ञपदीं कीं कूपीं बसुनि मानितो सरड.
(२२) मी विजय असें तुजचि न सकळांही कौरवांसि कळवीतों.
(२३) ... . रिपुसम असह्य गदें[3] नाहीं.
(२४) [4]व्यसनीं जरि गडबडते साधु तरी त्यांसि सुज्ञ कां गाते?
(२५) वर हि वरायास पाहिजे समज.
(२६) शय्येवरि न पडाया योग्य रणक्षितिवरीच हा काय[5].
(२७) ... ... सीतेसहि सोडिलें न भोगानें.
(२८) सुचली युक्ति करावी मग जरि दैवें न होय शोध न हो.
(२९) सन्मन अनृता भीतें जोंवें कुठारायुधा समस्त वन.

---

१ चित्ताला. २ शुद्ध. ३ रोग. ४ संकटीं. ५ देह.

(३०) ... . सुज्ञांहीं ऐकतांचि डोलावें
ऐसेंचि बोलणें जरि तरि पुरुषानें द्दहांत[1] बोलावें.

(३१) साहे विविधोपद्रव वाहे पृथ्वी चतुर्विधें भूतें;
आहे उगीच, (कर्णा) न कधीं बोलोनि दाखवी भूतें.
जाळी ज्वलन न बोले न वदेचि जरि प्रकाश करि तरणी.
न वदोनि कुलज पुरुषहि आले स्वयशः प्रकाश करित रणीं.

(३२) सुत्हदुक्ता हितकामें धनकामें जड ह्मणों नये परिसा.

(३३) सर्दासि परिस्फुट[2] शब्दचि कार्य कराया समर्थ सदसिपरी[3].

(३४) अद्भुत कर्म करुनिही बा न वदति एकही वच नयज्ञ.

(३५) अरिच्याहि सद्गुणांतें प्रेमें वाखाणितात सुज्ञानी.
खळ हो मग वर्णावा कां न जगन्मान्य शिष्य सुज्ञानी?

उद्योगपर्व.

(१) आलें असे कपाळा कीं निंदुनि हंस वायसां गावें.

(२) आलें असे कपाळा कीं स्वभुजांशीं स्वयेंच भांडावें.

(३) आला कोप जन्हितन्हि न सोडिति सहज क्षमेसि सुरसिक ते.

(४) अन्यायें मेळविलें देतें न करूनि वाणि हानि धन.

(५) कोणीहि सदुपदेशामृत लवहि प्राशितां कधीं न मरे.

(६) कामें कोपें लोभें नागविले अमित यांस जे भुलले.
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुष हीरही उलले.

(७) केवळ हितोक्ति कृत्या। भासे त्या काळदृष्टि ज्या गांठी.

(८) .. .. कोण करील सावधान मत्तातें?

---

१ सभेमध्यें. २ स्पष्ट. ३ तरवार.

(९) करिती सर्वस्वाचें　परि न यशाचें सुबुद्धि मोतेंरें.
(१०) चित्त प्रसन्न नसतां　उपचाराग्रह नव्हेत [1]जाचकसे.
(११) खळत्हृदय शून्य केवळ　शून्य असें व्यर्थ कां नभा गावें.
(१२) (विदुर ह्मणे) जो आस्तिक, गुरु वेदोक्तीं जयास विश्वास,
मीपण ज्यासि न शिवलें,—तो पंडित मान्य होय विश्वास.
दुर्लभ वस्तु न वांछी,　न करी जो नष्टवस्तुचा शोक,
आपत्तींत न मोहे,—त्या पंडित ह्मणति जाणते लोक.
विद्या नसोनि उद्धत　धन नसतां जो उदारपणा वाहे,
अर्थासि नीच कर्मे　जो संपादावयासि जन पाहे,
नसतां लाभ यशाचा　दाटूनि करी परार्थ जो यत्न,
मित्रार्थी कपट करी,—तो साक्षात् मूढजनशिरोरत्न.
मित्रत्व दे अमित्रा,　जो मित्रद्वेष दुष्टकर्म करी,
तो मूर्ख असें ह्मणती　पुरुषपरीक्षा कळे जयांसि बरी.
(१३) त्या काय टंक भंगिल　घनही भंगूं शके न हीरा ज्या.
(१४) दुःख परासि न द्यावें,　सत्य वदावें, क्षमा न सोडावी;
जोडावी कीर्ति असी　कुलरीति तुम्ही कधीं न मोडावी.
(१५) .. .. दुरभिमान न बरा देइल　धनपति करींहि खर्पर हा.
(१६) श्रमवी श्रमवी मळवी　पळवी सत्कीर्तिला दुराग्रह रे.
सेव्य सदुपदेश सुधा- ग्रह असदुपदेश हा सुराग्रहरे !
(१७) ..　..　..　न वळति ते ज्यांसि काळ करि पक्क.
(१८) निजधर्माश्रित न बुडे　निजधर्मच्युत कधीं न अधम तरे.

---

१ खापर.

(१९) मैंदाचे स्वीकारिल कवण विचक्षण अमूल्य निष्कपट.
(२०) मधुर वदा प्रियचि करा प्रभुपूजा परम शुद्ध भावानें.
(२१) पडतां गांठि गतश्री[1] होय शशी दोष काय हा रविला.
(२२) पुरुष कुलार्थ, ग्रामा करितां कुळ, तोहि जनपदा करितां,
आत्मार्थ भू त्यजावी, असि नीति ·· ··
(२३) बाहेरि गमे नीरस परि अंतर मधुर पूत पणसाचें.
(२४) बहु जनवाद अनावर वेग न रोधील कोण तोयाचा.
(२५) वरि बरवा आंत न जो तो काय करील काम लाखोटा?
(२६) ... ·· वाखाणिल सद्रसना आपुल्या कशी महिम्या ?
(२७) होईल काय हंस ब्रह्याच्याहि बसला बक विमानीं ?
(२८) होतो मदांध जो त्या स्वहित अहित कायगा कळे नागां[2] ?
(२९) हरि कोपतां गजांतहि शिरती मग कां न हानि मेषांतें[3] ?
(३०) ... ... सत्सख्यें संकटीं कुजनहि तरे.
(३१) .. .. सखे जे होती फिरतांचि विधि वृथा परें[4] ते·
(३२) सदहितजनसंपर्कें सुकृताची होय मृत्तिका (राया !)
(३३) सामेंचि कार्य होइल जरि, तरि युद्धासि काय कारण हो ?
(३४) सूक्ष्माहि रविकरांहुनि बहुत तमा काय कांकडा खातो.
(३५) धर्मन्यायविरोधें कोणाचेंही न इष्ट साधेल.
(३६) धर्माश्रित जय पावे न अधर्माश्रित; न यांत संदेह.

---

१ निस्तेज. २. हत्तीला. ३ मेंढयांत. ४ शत्रु.

भीष्मपर्व.

(१) कीं गोष्पदीं बुडावा लंघुनि रामार्णवा अगाधा त्या.
(२) एक्या सदुक्तिनें जी सुगति घडे ती न कोटि शिबिकांहीं.
(३) करितां साधूच्छेद स्वोच्छेदचि होय हो यश न राहे.
(४) कोण तयांतें मारिल ज्यांचें जगदीश परम तो कवच.
(५) नखहि नको ज्या कार्या त्या काढावा कशास करवाळ[1].
(६) पावे न सूक्ति कुजनीं हतभाग्य जनींहि सुरभि मानातें.
(७) बुडती व्यसनीं थोरहि होतां दुष्टां जनां पळ सहाय.
(८) राहेल कसी कौस्तुभ-मणिपाशीं माणिकांत झिगझिग जी.
(९) व्यसनीं तेज न सोडी कुलजत्हृदय पावकांत माणिकसें.
(१०) वपु न बहुत पोषावें यशचि सदा खाय ज्या न कीनाश[2].
(११) व्हावें शस्त्रेंचि रणीं वीरांचें गलित वपु न रोगानें.
(१२) क्षुद्र नदी जसि धरिती न धरि तसा दुरभिमान सागर गा.

द्रोणपर्व.

(१) आत्माहि उपेक्षावा परि रक्षावाचि बोल संतांनीं.
(२) ... . आपण लाउनि पोषुनि तरू न कापावा.
(३) उपदेशासि न वळतां कोणीही न शुभ लाभला मागें.
(४) .. .. उरे धनलोभें भीति नीति न व्रीडा.

---

१ तरवार. २ यम.

(५) .. .. अधनाचें जेंवि बायको न करी.

(६) अनुकूल दैव असतां न समर्थ करावयासि हानि यम.
होतां तें प्रतिकूल प्रबलहि दुर्बलचि होय हा नियम.

(७) .. .. .. अभिमानें कोणकोण न ठकविला.

(८) .. .. .. काढिल नसतां मनिं मोह काय बापरडें.
वांकेल ताजव्याचें भारावांचूनि काय बा परडें.

(९) कीं भंगतां प्रतिज्ञा मानधनें अग्नि वा हिरा खावा.

(१०) कां नवलास नव्हे घट कर्ण गळीं जरि बसेल कानवळा.

(११) ज्या काळाच्या वदनीं मेरु विरे त्यांत कां न पृथुक[1] विरे ?

(१२) ज्या वाटेनें गेले गुरु धरिती छात्र त्याचि वाटेतें.

(१३) तेजस्वी नच वांके; स्वीकारिल केसरी कसा जीन ?

(१४) ते धन्य पुरुष धर्मी नेणति आयास भीति आळस जे.

(१५) दैवत्यक्तासि शके न सखा न पिता न माय ताराया.

(१६) द्रवतेंचि दैव असतां निश्चय नसतां मनांत निर्वेदें[2].

(१७) .. .. पुत्रोत्कर्षे कुढे[3] न कुपिता हि.

(१८) भावंड बुद्बुदांचें वपु अति निःसार मित्र फेंसाचें.

(१९) मृत्यु हरितसे समयीं अमरांसहि; कवणं मृत्युला चुकवी ?

(२०) राजानें राजासीं भांडावें, तदितरांस वरजावें.

(२१) श्वश्रूकर जेंवि शिरे गेहीं जरि न ह्मणती सुना सीर.

---

१ पोहा. २ कंटाळा. ३ दुःख मानीं.

(२२) शूर भुजांनीं क्षत्रिय, शब्दांनीं विप्र, पार्थ चापानें;
केवळ मनोरथांनीं कर्णा ! तूं शूर न प्रतापानें.
(२३) सोडावी प्राणाची प्रभुचीच प्रीति पूर्ण जोडावी.
(२४) स्वजनपरित्राणाहुनि अन्य व्रत मत नसेचि आर्याला.
(२५) सावध हो, बा व्यसनीं पडतो साहस करून कोपरत.
(२६) सोसे कुलजा मृत्यु न अयशाचा सोसवे चुना नाकीं.
(२७) सोडावें कुळजांहीं जीवित समरीं, न शस्त्र सोडावें.
मोडावें आप्तवचन अयश शरीरार्थ केविं जोडावें ?
(२८) .. .. विफल जसे दुर्जनीं सदुपदेश.
(२९) वीराशयासि वीरचि समजे, नुमजेचि न सम जो नीच.

कर्णपर्व.

(१) वर्षावर्षीं[1] जेविं न वृद्धिक्षय सिंधु हेचि बुधरीति.
(२) .. .. .. कवि शोकाब्धी धृतिप्लवें[2] तरती.
(३) .. .. शुद्ध यशश्री कधीं न वरि सोंगा.
(४) कोठें कवणा आलें यश करितां कर्म आग्रहें खोटें ?
(५) करुनिहि अतुल पराक्रम न वदति कांहींच शूर. .. ..
(६) अवधीरणाचि[3] करि तें मानधना दुःख ज्या नसे अवधी[4].
(७) प्रभुसीं वैरहि करितां दुष्टहि पावे प्रसिद्धिला लोकीं.
(८) .. .. श्लाघ्य स्तव्यहि रिपुगुणहि गुणज्ञमंडळीं होतो.

---

१ वृष्टी झाली अथवा न झाली तरी. २ धैर्य हीच कोणी नौका तिनें. ३ तिरस्कार. ४ मर्यादा.

(९) .. .. सिंधु शुक्तिगर्भी मौक्तिक उपजे नदींतही असती;
पुष्कळ सिंप्या, परि तीं त्याच्या उदरीं न मौक्तिकें वसती.

(१०) .. .. होणारा पुढें न बळ चाले.

(११) ईश्वरवरानुकूलें दैवें होताति कामना पूर्ण.

(१२) शशमंडळांत कोल्हा ह्मणतो मी सिंह, वल्गना करितो.—
जोंवरि न पाहिला गजमुक्ताफळकवळभक्षिता हरि तो.

(१३) .. .. .. गुणवद्गुण जाणे गुणवंत, अगुण नेणेची.
प्रसवे तीच अभिज्ञा (शल्या) तैसी न वांझ वेणेची.

(१४) विंध्यासि मेरु मेरुसि विंध्यचि जाणें न अन्य नग नीच.

(१५) .. .. भले भ्रमतां पथ दाविती खळाहि तमीं.

(१६) निवडे निकटचि वर्णें दूरसमचि पद्म पुष्प पळसाचें.

(१७) .. .. .. उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत.

(१८) पाहों नयेचि आंगीं बळ असतां दीन जंतुचा अंत;
ऐसें सत्पुरुष व्रत. .. ..

(१९) धनदाचिही नसे मग अन्याची काय निस्पृहा परवा.

(२०) दुष्ट परच्छिद्र जसें पाहे तैसें न आपुलें पाहे.

(२१) जरि पापदेशवासी तरि न करी पाप सर्व जन कांहीं;
नित्य खळांतचि असतां साधु खळांच्या गुणा शिकत नाहीं.
पंकांत पद्म न मळे; काकांच्या दुर्गुणा शिके न पिक[1];
चंदन परगंध न घे; होय तृणामाजि तृणचि काय पिक.

(२२) पंजररुद्ध व्याघ्राप्रति लोक विशंक मारितात खडे.

---

१ कोकिल.

(२३) .. .. कलहीं कुलटा[1] अजिंक गरतीस.
(२४) जागा दाटुनि केल्या हरि वांचाया नसे गजा जागा.
(२५) गृह आधीं रक्षावें अयशाहुनि अधिक काय काजळ तें.
(२६) श्रम तेजस्वी गणिते तरि मर्त्यत्वीं अमर्त्य कां गमते?
(२७) जरि दुर्दशाचि तरि हरि आठवतां दुर्दशा न शोभा ती.
(२८) ह्मणती बुध प्रतिज्ञा वचन करावेंचि जतन. .. .. ..
(२९) न लघु सुगुण न गुरु अगुण तुलसीची सरि न शाल्मली लाहे.
(३०) जो युद्धपराङ्मुख जो शत्रु नव्हे जो कृतांजली भ्याला
पळतो प्रमत्त शरणागतही जो न भिती भले त्याला.
(३१) जो सत्याचा वक्ता साधुचि तो यांत संशयचि नाहीं.
बहु पूज्य सत्यवादी त्रिजगीं उपमान त्या नसे कांहीं.
(३२) मान्यातें "तूं" ह्मणतां करितां अवमान होय वध .. ..
(३३) अपमानें गुरुचा वध होतो शस्त्राविणेंचि तुंकारें[2].
(३४) करिल क्षमा क्षमाधन निवतें सुजनमन नमन करितांची.
(३५) परनिंदेनें परवध आत्मस्तवनेंहि आत्मवध होतो.
(३६) गजहि हरिपुढें न जगति रक्षीति कसीं स्वजीविता श्वानें?
(३७) मित्र सहज एक दुजें सामें दानें करूनि मित्र तिजें
चवथें हितें प्रतापें मित्र मिळे. .. ..
(३८) कटु परि हितकर .. ..
(३९) न सुखद दुराग्रह सखा हा सर्वाऽनर्थ गेह ढक्क ..
(४०) गिळित गजाऽजगर-गळ्यां[3] पाहे शशमांस घांस लागाया.

---

१ व्यभिचारिणी स्त्री. २ तूं या अक्षरानें. ३ ज्यानें हत्ती गिळिला त्या अजगराच्या गळ्यास.

(४१) … … जय कैंचा साधुजन विरोधानें ?
(४२) ज्या लाभ हानि जेथें नेतो बांधोनि काळ दाव्यानें.
(४३) … रजतांसि[1] न पाविजे तुला कथिलें.
(४४) न परबळें विजयार्थी इच्छिति जय निजबळेंचि. …
(४५) नीच व्यसनीं बुडतां निंदिति दैवासि, न स्वकर्मातें.
(४६) साधु न हाणिति अरिला पाहति अधृतायुध व्यथाकुल जा.
(४७) जी कीर्ति पूर्वजांची बुद्धिमती करिति पुनरपि कवी ती.
यश बुडवुनि अयशातें सुकुळक्षेत्रांत कुनर पिकवीती.
(४८) दुर्व्यसन राहु गिळितां पुण्यें सज्जनरविप्रभा वांचे.
(४९) विद्याभाग्यबळमदें अनयें नयरंजनासि गांजावें,
देउनि शोक स्वजना जोडूनि जगीं अकीर्ति कां जावें ?

शल्यपर्व.

(१) … संसारीं सुवचाचें[2] ग्रहण जसें संगरांत[3] वर्माचें[4]
(२) … … श्रमल्याविना न जय जोडे.

गदापर्व.

(१) … … व्यवहारीं धरूं नये भीड.
(२) अधिक बळीहूनि कृती. …
(३) बळ असल्या दावावें प्रथम विकत्थन[5] समग्र वर्जावें.
(४) जो कर्म जसें करितो तैसें सुख दुःख भोगितो लोक.

---

१ रुप्याशीं. २ चांगल्या वचनाचें. ३ युद्धांत. ४ कवचाचें. ५ वडबड.

(५) दुरतिक्रम काळ असी वृद्धोक्ति ...
(६) सर्वस्वहानि सोसे प्रभुहानि कुब्जमना सहावेना.
(७) ... स्वजन वियोगा असें नसे कष्ट.

स्त्रीपर्व.

(१) धर्माधर्म हिताहित इत्यादि विचार कायसा कुपितीं.[1]
(२) ... यतोधर्मस्ततोजय.[2]
(३) निज धर्मचि संसारीं मुक्तीचे हेतु सूनु गुंतीचे.[3]
(४) मन मातेचें चिंतुनि अगुणाहि मृता मुलास कळकळतें.
(५) ... व्यसनीं सत्य बोलका तरतो.
(६) ... विधिनें लिहिलें चुके न अक्षर तें.

शांतिपर्व.

(१) गजमुक्तांचाचि हरिस अन्याचा तेविं दे न चत्र घास.
(२) ... जो धीर
तोचि धरेतें भोगी विद्वान् विख्यात विक्रमी वीर.
(३) दुष्टदमन अपलायन युद्धीं द्यावें, सदाश्रिता शर्म.[4]
राजांचा हाचि परम हेतु अशेषार्थसिद्धिचा धर्म.
(४) क्रोध क्षमा अनुग्रह विग्रह भय अभय दान आदान
जेथें तो धर्मात्मा होय इतर पात्र साधु वादान.

१ रागावलेल्यास. २ जिकडे धर्म तिकडे जय. ३ बंधाचे. ४सुख.

(५) कळवावें वैद्याला दुःख, कुशल तोचि संहरायाला.
(६) श्रीगुरुचें उतराई व्हाया नमनाविणें उपाय नसे.
(७) ऐसें तेज कवण जें ब्राह्मणतेजास दंडवेना तें.

अनुशासन

(१) तो काय जन जयाच्या धन्यत्वें हर्षली प्रसू नाहीं ?
(२) ... लज्जाकर जेविं परपटोपभोग परिटांचा.
(३) ... गुणहि अगुण होय जो न दे तोष.

अश्वमेधपर्व.

(१) रसिकें तैल न खावें मिळतां नव विपुल धेनुचें आज्य.
(२) सासू करी उपेक्षा त्यागीना स्वविनयासि परि सून.
(३) गोडी कळतां मधुतें जसि मासी वारितां बहु न सोडी.
(४) रसिकपरीक्षेंत जसें सरसत्वें घृत तसें न तेल टिके.
(५) उपदेशासि मति जसी गीतासि मृगी तसीच वेधावी.
(६) जो प्रभु अरक्षक तया घेऊनि सुतपसहाय शापावें.
(७) कोपवश पुरुष निजतप शापुनि वेंची न कोप हा साधू.
(८) भलत्यासि संशयानें प्रेमाचा भंग भार्गवा होतो.
(९) विधि रक्षिना जया त्या कोण कुशल करिल वस्तुला जतन ?
(१०) जेथें आकृति तेथें वसति सुगुण ह्मणति कवि वृथा काय.
(११) उघडील जी कपाट स्वर्गाचें ती जिवीं धरावि किली.

---

१ माता. २ दुसऱ्याच्या वस्त्राचा उपभोग. ३ तूप.

(१२) ... सद्भक्ता करवीं धन लोभ प्रभु दयालु टाकवितो.
(१३) ज्ञात्याला ताप वसे अन्य शरीरांत परि सकळ कळतो.
करि साधु त्या अतिथिची आत्मकुटुंबाहि परिस कळकळ तो.
(१४) आर्तांच्या कां देइल धर्मज्ञ न हाक विप्र सादास ?
(१५) ... येतें भोगासि तेंचि जें उप्त.

आश्रमवासीपर्व.

(१) तो फळपात्र नव्हे कर जो सिंचायासि आळसे वेला.
(२) त्यजुनि मणि पसरिला कर हतभाग्यें फुटकियाहि कवडीला.
(३) देतात शर्करेचे भिन्न ह्मणुनि काय भिन्न चव घांस.
(४) ... फिरतां वज्रासि तृण करी दिष्ट.
(५) तरुणपणीं गोड पुढें वृद्धपणीं विषय ते सपकें सारे.
(६) सत्कर्म योजिलें जें नेती सिद्धीस संत, राया, तें.
(७) सुज्ञ पुरुष एकहि बहु, राजा, न बरे सहस्रही मूढ.
(८) वंध्यत्व लिहो भाळीं विधिचें कदपत्य न करकंजें लिहो.
(९) विसरति अपकारातें उपकारातेंचि साधु आठविती.
(१०) व्हावें कशास तें बा आप्तांचीं जें न करिल धन काजें.
(११) भवनीं न वनींच सुकृत. ...
(१२) भीता अभय, क्षुधिता अन्न, अनाच्छादितास दे वास;
वेडे! सर्व तपाहुनि हेंचि करील सुप्रसन्न देवास.

---

१ पेरलेलें. २ दैव. ३ बेचव. ४ कुंसतान. ५ करकमळ. ६ वस्त्र.

(१३) कविस रुचे घालावें विषयसुख करूनि घोर तप डावें;
मूढासि आवडे बहु जेउनि सस्त्रीक घोरत पडावें.

(१४) ज्ञात्यांनीं नच द्यावें शोकव्याघ्राननीं वृथा नरडें.

मौसलपर्व.

(१) विपरीत दैव होतां विपरीतचि मत पहा कसें रचितें.

(२) ज्ञाता सुरसज्ञ सिता[1] इक्षुरसीं एर काकवी लाहे.

(३) ·· निजदुःख भल्याच्या न बहु सुहृद्दुःख तें मतिस खातें.

(४) धन होय प्रभुचें हें तुमचें लोभें न आंधळें मन हो.

(५) ··· विधिगति दुर्ज्ञेया वर्णिलीच थोरांनीं.

(६) देतो तसेंचि घेतो फिरुनि हिरुनि सर्वकाळ बाळकसा.
याच्या उतरेना जन सितबाळ[2] तसाचि काळबाळ[3] कसा[4].

महाप्रस्थानिकपर्व.

(१) तारिल इतर कवण त्या बा निजशीलचि जना न ज्या तारी?

(२) देवर्षिपतन कर जो गर्व न देईल कां पतन यातें ?

(३) ··· बहुभाग्यांत दैन्य दे व्रीडा.

स्वर्गारोहणपर्व.

(१) ज्या लोकांत खळांचा बहुमान तयांत कोण राहील?

(२) कर्मांची गति गहना संसारीं बहुत हाचि पथ वाहे.

---

१ साखर. २ वृद्ध. ३ तरुण. ४ कसाला. ५ लाज.

(३) ... देतें मर्यादेतें कुलीन मन मान.

(४) ... ... शिशुसि निंदिना माय.

संशयरत्नमाला.

(१) × वरि तसाचि आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा.

(२) ... धनत्रंत कण कसा वेंची.

विनायकमाहात्म्य.

(१) करणेंचि तरि करावी स्पर्धा विंध्यें सुमेरु शैलासीं.

(२) आकार असो लघुगुरु तेजस्वी साधितो विजय योध.

सन्मणिमाला.

(१) जरि उकिरड्यांत पडला मळला न हिरा तथापि सामान्य.

(२) शिववंदनकामांहीं लंघावा प्रथम देव नंदी न.

पंढरीमाहात्म्य.

(१) पाप्यासि पंढरी काय?

(२) बाहेर प्रेम जया त्याच्या दैवीं सदैव आहे र.

अंबरीष–आख्यान.

(१) ... प्रभुजनिं रचिलें वैर तें कंप देतें.

(२) कोणालाहि निजेष्ट लाभ न सदुच्छेदोद्यमें साधला.

पाषाण स्वशिरीं पडेचि गगनीं मित्रासि जो हाणिला.
कीं पाय ज्वलनीं जळेचि.

महद्विज्ञापना.

(१) ... दानीं न सुज्ञ कोपावा.
(२) ... गुरुचि होय गुरुमित्र.
(३) ... बालकवचनातें देते सप्रेम कान आइ कसी.
(४) जड उपकारा न करी स्वाधीन असोन कल्पनग मोहें.
(५) उमटे तोचि तरुफळीं असतो जो काय गुप्त गुण बीजीं.
(६) प्रभुला किमपि न दुर्घट; भारी गरुडासि काय हो चिमणी ?
(७) अर्थी इष्ट न मिळतां नच सोडिल करिल हाल घुसळील.

केकावलि.

(१) ... उरे न तृण भेटतां इंगळा.
(२) ... न सुरभी विष क्षीर वी.
(३) व्रणार्थ पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे
स्मरादि रिपु मन्मनीं; अहि न काळ भेका कसे ?
(४) न लाभ मणि हेम भूपतिस जोडिल्या आयसें;
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती,
गुणा न म्हणतां उणा अधिक आदरें सेविती.
(५) घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें.
(६) ... ज्यां मिळे अमृत ते न मद्या पिती.

(७) कृतांत कटकामलध्वजजरा दिसों लागली,
पुरःसर गदासवें झगडतां तनू भागली.

(८) कथा सुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती;
शिशूंस जरठांसही निरखितां रसें दाटती;
दुहोत भलते सदा तरि न लेशही आटती;
स्ववत्समल भक्षिती परि न सर्वथा बाटती.

(९) कसी तुळितसां तुम्ही मकट मेरुसीं मोहरी?
मसाद करितां उणे अधिक नाठवा. ..

(१०) मसाद मग काय तो जरि निवारिना लाघवा.

(११) ... पचे वर असाचि द्या चाकरा.
वृथाचि गमतें दिलें बहुहि जें न दासा जिरे.
पुसोनि अधिकार द्या सुकर ते सदा साजिरे.

(१२) उदारपण तें बरें सुखवि जें सुपात्रा सदा,
दिल्हें अमृत पन्नगा तशि खळीं कृपा त्रासदा.

(१३) ... कापिति
भटासि भट संगरीं परि न कातरा दापिति.

(१४) स्वतोक पितरां रुचे जरिहि कर्दमी रांगलें.

(१५) ... न ऋण जन्मदेचें फिटे.

(१६) बुडे बुडवि सागरीं तरि सुकर्णधाराविना.
सहाय नसतां स्वयें परतटासि ती दाविना.

---

१ नौका. २ चांगल्यानावाड्यावांचून.

कवीराचा–स्तव.

(१) त्यजुनि नवी रसिकाच्या मैत्री येईल कां मनास जुनी.

तुलसीदास स्तव.

(१) .. .. .. कवन निववितें सदा बुधा सरसें[1]
हें जों जों सेवावें तों तों सेव्यचि गमे सुधासरसें[2].

भीष्मभक्तिभाग्य.

(१) झाले निःशब्द जसे अस्तीं पक्षी समग्र सवित्याच्या.

नारदाभ्युदय.

(१) काय लघूची क्षेत्रीं न करी होउनि अनुग्र हलें[3] हानी.

अनंतव्रत.

(१) ... स्पर्शों देती जसी न आळ सत्या.

अहल्योद्धार.

(१) प्रायश्चित्तें पापें जळती मूळवासना राहे.

सुदामचरित्र.

(१) मीन समुद्रा त्यागुनि होइल कां पल्वलोदकीं दीन ?
(२) जाणसि कीं तें[4] कविला चवि लाउनि नेतसे जपोनि लया.
(३) ... न ख्यात
तात क्षीरधि परि हर– चूडारूढ प्रसिद्ध तज्जात.

---

१ रसयुक्त. २ अमृताचें सरोवरसें. ३ नांगर. ४ धनाविषयीं प्रेम.

(४) ... भस्मीं मीनासि काय हो टिकवे ?

(५) ... अनृतें कोणाचाही न लागला पांत.

(६) ... काय असे अदेय वरदासी ?

(७) सुहृदर्पित अणुमात्रहि तें ब्रह्मांडापरीस करि थोर.

नामरसायन.

(१) दीन व्यसनीं बुडतां ताराया साधुहात नावरिती.

(२) येतील समर्थांच्या कार्यासि समर्थ; काय तें चित्र[१] ?
तो धन्य स्तवनोचित जो दीन जळासि दुग्ध सन्मित्र.

(३) संत न अंत पहाती हातीं असतां समर्थ भगवंत.

(४) दवडाया दीनांचीं दुःखें सर्वस्व वेंचितो संत.

हरिवंश.

(१) फल भोगविल्यावांचुनि कैसा गे दोष राहतो उगला.

(२) मानधना घात यशोनाशीं नच निजवधीं. ...

(३) अप्रियकारि जनाचा अणुमात्र धरूं नयेचि विश्वास.

(४) जेथें विरोध तेथें न वसावें त्यजुनि नीतिची पदवी.

(५) जीर्णाचे केश जिरति, जीर्णाचे जिरति सर्वही दंत;
परि जीर्णाच्या जीवितधनवांछा ज्या तयां नसे अंत.

(६) ... सत्यक्तीं दैव कां नव्हे वक्र?

(७) आर्तांच्या भीतांच्या देतातचि हाक शूर हाकेला.

---

१. आश्चर्य.

(८) शकसिल तरि यत्न करीं; पण होणारासि कोण परिहरितो ?

(९) जिंकील काय खोटा बळकट मोठाहि काक हंसातें ?

(१०) ज्याची जी वृत्ति असे त्याची तीं देवता तिची सेवा;
जे वाद सांगतिल ते सांगोत, भजों नये परा देवा.

(११) ज्याच्या माथां बैसे काक तयाचींच लोचनें फोडी.

(१२) परकार्यार्थ तसा निजकार्यार्थं न उद्यमांत साधु निघे.

(१३) (कीं) एकेंहि दिनकरें होतात द्युतिविहीन आवि शें.

(१४) नीति असी कीं अबलें प्रबलासि रणीं कधीं न हटकावें.
दैवें विरोध घडतां बळहीनें त्यजुनि मान सटकावें.

(१५) नित्य उपद्रव होतां त्यजती पक्षीहि आपुल्या नीडा.

(१६) वाढवित्यांतें न भजे धर्मज्ञहि कोण हो असा नष्ट ?

(१७) तापविलेंही पुनरपि शीतळ होतेंच कीं जडहि तोय.

(१८) निश्चय हा आयु असे तों मरण नसेचि भीति सोडावी.

(१९) ... भद्र न पावे कदापि हातनय.

(२०) तो भाग्यें प्राप्त परि प्रिय वाटेनाचि पामरा व्याही.

(२१) न करावें परिणामीं तापप्रद जें मनास देहास.

(२२) ... प्रभुच्या आज्ञेपुढें उपाय नसे.

(२३) न करितिच पाय धरतां करितां विज्ञापना वरद हानी.

(२४) जनककुलाहुनि पतिकुल अधिक असावें असा वधूकाम.

(२५) ... अनय कां मनीं न सले ?

(२६) अर्थिजनें कल्पतरु त्यजुनि परोतें धनार्थ कां गावें ?
(२७) (जी) श्रीची कीर्तींची पुण्यधींची करी सुरा माती.
(२८) ... पतिहूनि अधिक सतीस तें काय ?
(२९) काळाची गति उग्रा कोणाहि भविष्य बा परतवेना.
(३०) ... कां नसतां दीप न तम खवळेल ?
(३१) ... धीरा कृतनिश्चयासि काय न हो ?
(३२) ... सेवा स्वल्पाहि अवसरीं बरवी.
(३३) वीरांसि गमति रणमख गुरु इतर श्रेष्ठ पण असारचि ते.
(३४) ... जेंवि द्रविडद्विजांसि भात शिळा.
(३५) सुस्वामि भक्त समयीं वेंचिति जें धन असेल पदरीं तें.
(३६) तें अमृतचि सुजनाला कुजनाला स्पष्ट विषचि चाखविलें.
(३७) बा एकनिष्ठ चातकवदनीं घन कां न अमृत ओतील ?
(३८) क्षुद्राहि परा भ्यावें मग बुध हो कोपल्या न कां रुद्रा ?
(३९) न माशावी कोणी ज्ञानाची करितसे सुरा माती.
(४०) ज्यां अमृतकर त्राता पावति कुमुदें कदा न दाहा तीं.
(४१) लागे उपहासास्तव बा मानधना जना हिरा खाया.
(४२ अ) ... तेजें सकळें हि रविपुढें हलकीं.
(४३) दुष्ट जनातें ने तो लीलेनें संगरीं हरि लयातें.
(४४) भ्रमला काय वदेना साधूंच्या निंदितो सुरा[१] सदीं.
जो मत्त म्हणेलचि तो देवेंद्रातेंहि हा सुरापसदा.

---

१ मद्यपिणारा. २ सभेला.

(४५) ·· ··· जय श्री भगवद्भक्तीं वसे नसे अधर्मी.
(४६) साहेल स्फटिक लटिक काय परीक्षा न भंग पाहेल.
(४७) कैंचा विवेक पडला षडरातींचा[1] प्रसिद्ध घेरा ज्या.
(४८) ज्ञान परम धर्मांचें साधक आहे जगांत इतराचें.
(४९) शांता कुसंग तापद, घनहि घृत ज्वलनसंघर्में विघरे.
(५०) ज्या शील त्यजितें त्या कां न त्रैलोक्यनाथ शासील?
(५१) ··· प्रभुनें मारूं नेथचि दूतांतें.
(५२) सोडूनि मानसातें हंस क्षण ही दुजें न सेवि सर.

बृहद्दशम.

(१) ··· जातां वित्त क्षण कृपण चित्त स्थिर नसे.
(२) ... पळहि न जगती द्वेषितां मीन तोया.
(३) जसा ज्याचा काम स्वर्गरम[2] तसा त्यास फळतो.
(४) ... दृष्टि निवळे
न ज्यांची त्या रोग्यां दिसति दरदुग्धेंदु[3] पिवळे.
(५) ... जिंकी न वीरा नट.
(६) लोभ क्रोधानृताचें गृह बुध म्हणती द्यूत ठावेंचि आर्या.
(७) केली दीर्घ सटादिवेष रचना ज्या ग्रामसिंहास तो
मत्तेभप्रभुकुंभभंगनिपुणा[4] पंचानना हांसतो.
(८) ... सुज्ञसभाप्रसाद दिसतां दावी गुणातें गुणी.

---

१ षड्रिपूंचा. २ कल्पतरु. ३ शंख, दूध, चंद्र. ४ मत्त इभमत्तहत्ती.

(९) ... जाय अमृत व्याळांसि देतां वृथा.

(१०) करिति कुमति प्राणत्रात्याचिया अवमानना,
न निरखति यासाठीं ज्ञाते कधीं अवमानेना.

(११) दीनीं देव करी दया. ...

(१२) ... मूळ द्रुमाचें जळें
शिंपावें तरि तृप्त होति सकळें पुष्पें फळेंही दळें.

(१३) निंदी विश्व गुरूसि तत्परजना जो बोल त्याचे कुडे
ऐके जो नरकांत निंदक जसा तैसाचि तोही बुडे.
वारावा खळ शीघ्र तेथ सबळें कीं दुर्बळें तेथुनी
जावें यास्तव घालिति श्रुतिपुटीं बोटेंचि मोठे मुनी.

(१४) निंदावा त्या प्रसंगें अगुरुचि चळती न त्यजी स्थैर्य मेरू;
सिंह क्रोधें न गर्जे जवळिहि करिती यद्यपि श्वान फेरू.

(१५) ऐसें सज्जन भाग्य गोड परि त्या झालें खळा कारलें.

(१६) ... सुगुणेंहि शिलाही साहील किती सुताप तो कांचे.

(१७) .. .. सागरीं वृथा वृष्टी.

(१८) भक्तीं स्वल्पहि दिधलें तें प्रेमें होय मज सख्या कोटी;
मोठी प्रीति तयाची गोष्टी तुजसीं वदूं नये खोटी.
दिधलें बहुहि अभक्तीं तरि तें माझ्या न होय परितोषा;
दोषाभिज्ञा न रुचे अत्यनुकूळाहि जारिणी योषा.

---

१ हलकटाच्या तोंडास. २ हलके.

जळ दळ फळ पुष्पहि जो देतो मज भक्तिनेंच जें त्याचें
साचें प्रेमार्पित तें सेवितसें मी विशुद्ध चित्ताचें.

(१९) ... कुचले हिरवे जसे तसे पिकले.

(२०) ... नृपकन्या दूर, दुर्दशा जवळी.

(२१) ... सुमति खळाला, अचक्षुला रत्न.

(२२) सद्योजात[1] मराळें[2] स्तुत्य; न वृद्धांहि वायसां गावें.

(२३) जो जन कृतघ्न त्याचें स्पर्शन दर्शन अभद्र. ...

(२४) दंतीनेंचि स्वबळें काढावा पंकमग्न जो दंती;
साधूनेंचि हरावी बोधें जे साधुच्या मनीं खंती;
संकट पतिव्रतेचें पतिव्रतेनेंचि कीं निवारावें;
नौकेनें नौकेला बुडतां यादोनिधींत तारावें;
रणयज्ञीं भूपाला व्हावें अंगें सहाय भूपानें;
सागरतृषा हरावी कैसी स्वादूदकेंहि कुपानें ?

(२५) साव परंतु दिवाळें निघतां कोठें खरेपणा ठाव?

(२६) वैद्यांत रोग आर्तें उघडावा, शोकही शरण्यांत.

(२७) तक्रासि दोष कैंचा शुभ्रपणें म्याचि मानिलें दुग्ध.

(२८) स्वाघें[3]न पाहे कोणी दूषी दुसऱ्यासि हेंचि नीचपण.

(२९) ... कोण अनादृत सुधेसि ही सेवी ?

---

१ नुक्ता जन्मलेला. २ हंस. ३ आपला अपराध.

सुदामचरित्र.

(१) भक्तें प्रेमें अणु ही दिधलें तें मज पुष्कळ होतें,
बहुहि अभक्तें समर्पिलें परि अल्पचि भासे हो तें.

गोपीगोडवा.

(१) मेला विधि ऐकवितो, सखि जें स्वर्मी हि नायकावेंच.
(२) .. .. सखि आश्रित आश्रया न विटवीती;
यश नाहींच करिल कीं किति शोषिल तो समुद्र टिटवी ती.
(३) .. .. प्रभुजन असतां कलंकही शोभे.
(४) विद्रीहि कामुका स्त्री, घुबडाला काय नावडे घुबडी.
(५) तीर्थचि तीर्थीं मिळतां जो गांवांतील दुष्ट खळमळ तो.
(६) महदाश्रय कीर्तिप्रद नसता तरि झटुनि कां गुणी वरते?
(७) कवडयांची न मिळावी परि मणिमाळा पथींच सांपडली.

ध्रुवचरित्र.

(१) पेरावें बीज जसें त्याचें प्राप्त फळ तसें होतें.
(२) व्हायाचें तें होयचि; कोणें भावि चुकविलें दक्षें ?

प्रश्नोत्तरमाला.

(१) शिष्या ! अंधापरिसहि कामी बहु अंध हें मनीं मानीं.
(२) शिष्या ! स्त्रीनेत्रशरें पाविना जो व्यथेसि तो योधा.
(३) शिष्या ! पीयूषाहुनि फार सदुपदेश भाषणें सारें.

(४) शिष्या न मागणें हें गौरवबीज स्वमानसीं पाहीं.

(५) .. .. दरिद्रपण तेंचि जो असंतोष.

(६) याञ्चा लघुत्वकारण. .. ..

(७) वत्सा तेंचि जिणें रे ज्याची जाली नसे जगीं निंदा.

(८) परवशताचि निरय. ...

(९) तो मित्र होय बापा पापाचारांत जो बुडों नेदी.

(१०) .. .. भूषण मुख्य आपुलें शील.

(११) वाग्भूषण सत्यचि हें शिष्या जाणूनि नित्य हो मुदित.

(१२) वत्सा! समयीं नेणें प्रिय बोलायासि तो खरा मूक.

(१३) तें शल्य नेत्र झांकुनि केलें असतें सुगुप्त जें पाप.

(१४) जो सद्वृत्तापासुनि चळला त्याहूनि नीच तो कवण?

सन्मनोरथराजि.

(१) नुच्चारू परमर्मा जीभ नकारा जसी उदारांची.

(२) सत्संगतीं असावा प्रेमा ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं.

(३) स्त्रीस जसें न त्यजवे केलें उच्छिष्ट मांजरें दुभतें[1].
सद्धजन दूषिलें जरि दुष्टें मद्बुद्धि न त्यजू शुभ तें.

(४) काव्य करावें म्यां नच वचकावें दूषिती परि लघूस;
न करावें काय सदन कीं त्यांत पुढें बिळें करील घूस?

(५) मातेतें त्यजुनि पळहि जाय न भलतीकडे जसें बाळ,

---

१ पंखा.

सत्संगति सोडुनि मन नच जाउ तसेंचि घेउ हें आळ.

(६) कांपावें मन कुजनीं वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें;
सत्संगींच शिरावें बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें.

(७) सद्भजन न त्यजावें बहु कष्टीं संकटीं जसें वतन.

(८) समयीं आपन्नजनीं द्यावें सुप्रिय जनीं जसें उसणें.

(९) खळकृत निंदा सुखदा हो श्यालकृता[1] जसीच मतिस रव्वी.[2]

(१०) लागुनि असमर्थाच्या कांसेला वस्त्र पावतें दंड.

सत्संगस्तव.

(१) सत्संग अतिश्रेष्ठ श्रेयस्कर ह्मणुनि सुज्ञ या गाती.

(२) सत्संगति बहु मान्या थोराहुनि बहु दया करि लहानीं:
माता न असी ती हि स्नेहाची एकदां करिल हानी.

(३) देतो सत्संग जना अमृतकराहूनि शुद्ध सद्यश तें.

(४) सत्संग लेववी गुण जैसा पीडूनि हात कांसार.

(५) सत्संग जोडिल्यावरि जोडायाचें न राहिलें कांहीं.

(६) सत्संगें स्वच्छ हृदय भस्मानें जेंवि आरसा उटिला;
सत्संग सरळ करितो तावुनि वंशा शिखी जसा कुटिला.

नामसुधाचषक.

(१) .. .. देन अयःपिंड जन्म थेंबातें.

(२) रामाचें नामचि धन, जन धन ह्मणती जयासि तें खोटें.

---

१ मेहुण्यानें केलेली. २ थट्टा.

(३) स्वामिप्रसाद होतां रंकहि होतो सुवस्तुला योग्य.
(४) दुग्धप्रदासि निर्विष होइल मुख काय काद्रवेयाचें[1] ?

श्रीरामरीति.

(१) .. .. सुज्ञ प्रभु तुच्छ पदार्थंही न अवमानी.
(२) दोष कळोनिहि रुचतो प्रबळ प्राचीन कर्म ठकवीतें.

विष्णुपद—वकीली.

(१) प्रभुपाशीं शब्दाचा दीनाच्या पाळनीं बरा वेंच.

साधुरीति.

(१) वाढवि अन्याणुगुणा साधु सदा वायु जेंवि फुणगीतें;
सुयशानें जरि साजे लाजे परि फार आत्मगुणगीतें.

रुक्मिणीस्वयंवर.

(१) उतरे एकहि न कसीं कनकासीं कोटि भांडतां धुतरे.

नामार्या.

(१) तोचि उदार सदन्नें जो क्षुधिता पामरा जना वाढी.
(२) मातृस्तन्यावांचुनि शिशुचा कृश होय वरदुधें काय.
(३) तृप्तिसुखें अनुभविती रसवेत्ते लोक साखरेंत रसें;
रण गति गीतिहयहरिण जाणति गुण तोकसा खरें तरसें.

हरिश्चंद्र आख्यान.

(१) किं निःस्पृहताचि हिता काळीं विषयीं नदी जसी सुतरी.

---

१ सर्पांचें.

(२) (राया) या संसारीं बुध संरक्षावयासि सत्य जिती.
सर्वस्व त्यजिती परि सत्य स्वर्मीहि साधु न त्यजिती.
सत्यबहिष्कृत नर जो पितृवनसम[1] वर्जनीयता पावे;
पूर्वज सर्व निवावे सत्यें; अनृतें करूनि तापावे.
हयमेधसप्तकासह ज्यास सविधि राजसूयही घडला,
सत्यच्युत कतिरातें स्वर्गापासुनि तसा हि तो पडला.

(३) सत्यें हा रवि तपतो; सत्यें भूमिप्रतिष्ठिता जाण;
सत्यांत पुमर्थ सकळ; सत्यचि जीवासि पवि तनुत्राण.

(४) विप्रें केली ज्याची व्हावी धनदासही खरेदी न.
विधि फिरतां होती जे प्रभुचे जन दासही खरे दीन.

(५) .. .. विधिपुढें उपाय नसे.

(६) परि सत्यकवच असतां वक्र न होईल अग्र केंसाचें.

(७) जें स्वामिवाक्यलंघन तें सकलागांतें[3] होय अत्याग.

(८) सोडूनि जाय कुदशा सुदशा ये उग्र भोग तो सरतां.

(९) ज्या शाणघर्षणादिक संस्कार चढे गुणासि तोचि मणी.

---

१ स्मशान. २ नहुषराजा. ३ सर्व अपराधांत.

वामनपंडित.

(१) असत्यांतहि बोलतो सत्य वाणी. मृत्तिका भक्षण.

(२) (कीं) भोग कर्मानुगुणें अदृष्टीं. —वनसुधा.

(३) असुख कोण करी सुखदायका. —हरिविलास.

(४) जसे वर्णिती अंध बैसोनि हस्ती
धरूनी तदंगासही स्वस्वहस्तीं.
तुतें वर्णिती अज्ञ जैशा प्रकारें
तयां वाटसी तूं तसा त्या विकारें.
जया सांपडे हस्तिचा पाय हस्तीं
वदे तो स्वयें स्तंभरूपेंचि हस्ती;
जया सांपडे कान तो शूर्प दावी-
असी आत्मता सर्व शास्त्रीं वदावी.
धरी दांत खुंटा गमे त्यास हस्ती;
पठोंड असा जो धरी पुच्छ हस्तीं.
मनीं टोणग्याचेपरीही पहाती
जया लागलें स्थूळ स्फुल्लिंग हातीं.

(५) कुयुक्ति वादें करिती तनाना.

(६) ज्याच्या मतीं तत्व जसें जयाला
कानीं पडे तेंचि खरें तयाला.

(७) प्राण्यास संस्कार कधीं सुटेना,
स्वभाव बेडी सहसा तुटेना.

(८) ऐसी क्षमा तेचि मुकुंदभक्त.

(९) त्यजी काम तो निस्पृही. ...

(१०) असि सकळ अनर्था मूळ माझीच वाणी. —लोपामुद्रासंवाद.

(११) स्तब्ध होति लिखितें जशीं चित्रें. —वेणुसुधा.

(१२) पहातां पहातां पहावाच वाटे,
रुते चित्त जाऊनि नेत्रींच वाटे.

(१३) (कीं) एक यत्न नव्हतां दुसरा करीती. —यज्ञपत्न्याख्यान.

(१४) त्यजियलें अजिहि स्वनृपासना,
करिल त्याचिहि कोण उपासना? —रुक्मिणीविलास.

(१५) ऐश्वर्यवंत वय आकृति हीं समान
स्वार्थार्थ होतिल परस्पर त्यांस मान.
मैत्री विवाह न घडे अधमोत्तमातें.

(१६) धनाच्या मदें मान ज्याची लवेना.

(१७) दाता सुरद्रुम नमागतियास नाहीं.
न प्रार्थितां हरि न दे स्वउपासनाही.

(१८) जयां देती लाड प्रियपति तयांचाच टकळा;
कळा कांति भ्रांती धरुनि अतिधीटाच सकळा.—भामाविलास.

(१९) करें निर्मिला तो करें नाशिजेतो. —चित्सुधा.

(२०) आकाश अंत नकळोनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी. —नामसुधा.

(२१) उडति मानसहंस जया नभीं
शलभ त्याचि नभीं उडतां न भी.

(२२) न कळतां पद अग्निवरी पडे
न करि दाह असें न कधीं घडे.
अजितनाम वदो भलत्या मिसें,
सकळ पातक भस्म करीतसे.

(२३) न करुं पातक निश्चय हा घडे,
मन तथापिहि पापपथीं पडे.

(२४) हस्तीतें धुतलें जळीं बसविलें मालिन्यही नाशिलें,
तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें;
शुंडाग्रें धरिलें धुळीस भरिलें सर्वांगहि आपुलें-
प्रायश्चित्त दिल्हें तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें.

(२५) मद्याच्या कलशासि शुद्ध करितां व्यर्थेंचि तीर्थें जसीं.

(२६) कडुवट बहु वाटे शर्करा पित्तरोग्या
परि परम सिता ते पित्तनाशासि योग्या.
सहज मधुर तेंही पित्त नासूनि देहीं
निज अति रुचि दावी आवडों दे न कांहीं.

(२७) हरिकथा उदरार्थ जरी करी
स्वगुण नाम करी भलत्यापरी.
विकितसे उदरार्थ फुलें जरी
शुभ सुगंध कधीं न चुके तरी.

(२८) न अग्नि टाकी स्वगुणासि जेव्हां
टाकी कसें नाम गुणासि तेव्हां ?

(२९) गंगेंतही गज जसा धुतला तथापी

घाली शिरीं धुळि तसें जन चित्त पापी.
स्नानें करूनि जरि पावन देह झाला
पापीं प्रवृत्ति घडणार पुन्हा तयाला.

(३०) .. .. एथ अवघें नाणें खरें तोलणें.

(३१) जगिं वृथाचि न मंदहि वर्तती-
वदति शास्त्रविशारद ये रिती.

(३२) प्रयोजनावांचुनि मूर्ख तेही
प्रवर्तती न त्रिजगांत देही.

(३३) जळति अग्निकणेंचि तृणें जरी
तरि तयां प्रबळानळ कां वरी ?

(३४) फुलें भक्षितो तो फळें केविं लाधे?

(३५) कीं हस्ती धुतला तथापिहि धुळी तीरीं शिरीं घे...

(३६) अंधा सवें फिरति अंध जसे कुवाटे.

(३७) वैद्याचिया करिं दिल्हा बचनाग होतो —कर्मतत्त्व.
प्राणापहार गुण टाकुनि दिव्य होतो.

(३८) यत्नेंविणें फल कदापिहि सांपडेना;
यत्नें करूनिहि अहो फळ हें घडेना.

(३९) बीजेंविणें फळ कदापि नये द्रुमाला.

(४०) कर्मानुरूप सकळांसहि बुद्धि होते,
ज्ञात्यासहि तदनुरूपची वर्तवीते.

(४१) मिथ्या भुजंग परि ते भयकंप साचे.

(४२) सूर्यास लेप न जसा रजनीतमाचा.

(४३) अंधासि भास्कर दिसे न अशाच रीती,
झांकील नेत्रहि तई न रवी मतीति.

(४४) अंधासि अंधपथि घालिति अंध कूपीं.

(४५) (जसा) टांकिला कांडुनी धान्य कोंडा
समर्थीं, दरिद्र्यास तो होय मांडा.

(४६) एक प्रभाकर अनेक जळांत जैसा,
क्षेत्रें अनेक परि एकचि देव तैसा.

(४७) दपटिजे खलनासिक जेधवां
पसरितो मुख दुर्जन तेधवां.

(४८) .. .. कडे हातिचें दर्पणीं कां पहावें?

(४९) डोळे यथास्थित असोनिहि अंध होति.

(५०) मुखें ब्रह्मज्ञाना कथिति कर जोडोनि सकळां;
जगा दावीती ते कुशल कविता गायनकळा;
स्वयें आशाबद्धें सततचि धनालागि यजिजे;-
नव्हे ते गोसांवी विविधजन भोंदू समजिजे. —स्फूट.

(५१) असे हे गोसांवी उदरभरणाचे बहुरुपी.

(५२) विद्यासमन्वितहि दुष्ट परि त्यजावा,
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा;
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं
तो सर्प काय न डसे खल अंतरंगीं? —गीतार्णव.

(५३) कर्मानुरुपें फळ ईश योजी

(५४) अज्ञानाचेच कांटे वरि परि फणसीं षड्गुणांचेच सांठे.

(५५) ... विवश कर्णधराविण नाव रे.

(५६) जया रोग आरोग्य त्याला प्रसिद्ध. —चरम गुरुमंजरी.

(५७) धनाकारणें जे पराधीन. ... —द्वारकाविजय-

(५८) दयाहीनता वृत्ति हे राक्षसाची.

(५९) भिन्ना नसोन दिसती जळभिन्न गारा
वर्तूळ शुभ्र कठिणा मृदु थंड गारा. —विश्वासबंध.

(६०) तोंतों अधीक मनिं आदर मीपणाचा. —ब्रह्मस्तुति.

(६१) ते सिद्ध होउनि कदापि न होति मानी.

(६२) टाकूनियां सकस तंदुळ गर्भशाळी
जे स्थूळ फोल कुटिती श्रमती त्रिकाळीं.

(६३) त्यांला श्रमाविण नसे फळ अन्य. .. ..

(६४) सिद्धीविना हरिकृपा अवघ्या असिद्धा.

(६५) जरी हेम तावोनियां ओप देती
तयांतील त्या मिश्र धातू न जाती,
कसीं लावितां तें दिसे हीन सोनें;
तसीं शुद्ध चित्तें अहो भक्तिहीनें.

(६६) टाकी सुवर्ण मळ बाह्य हुताशनें तें;
तेंही पुटीं द्रवविलें तरि शुद्ध होतें.

(६७) .. .. सेविल तयास फळेल सेवा.

(६८) प्रारब्ध भोग न सुटे. .. ..

(६९) जो अंध त्याचें पद लागतांही विवेकिया क्रोधचि येत नाहीं.

(७०) .. .. मेरुपुढें जसि मोहरी.

(७१) गर्भांत अर्भक जरी जननीस लाता
हाणे तयास हरि काय करील माता?
(७२) कामातुरा प्रिय न बाप न माय कांहीं.
स्त्रीगोष्टि एक-दुसरें प्रिय त्यासि नाहीं.
(७३) (कीं) पापियास निजपातक जेंवि खातें. —भरतभाव.
(७४) प्रत्यक्ष दर्शनसुखास बहू भुकेला.
(७५) जें ज्यासि इष्ट जन सेवुनि तेंचि जाती —सीतास्वयंवर.

देवीदास (वेंकटेशस्तोत्र.)

(१) उडदांमाजी काळें गोरें । काय निवडावें निवडणारें ।
कुचलियाचीं वृक्षफळें । मधुर कोठोनी असतील ?

(२) आराटीलागीं मृदुता । कोठेनि असेल कृपावंता ।
पाषाणासी गुल्मलता । कैशिया परी फुटतील ?

(३) समर्थाचे घरींचें श्वान । त्यास सर्वही देती मान.

(४) नीच रमली रायाशीं । तिसी कोण ह्मणेल दासी ।
लोह लागतां परिसासी । पूर्वस्थिती मग कैंची ?

(५) गांवींचें होतें लेंडवोहळ । गंगेसी मिळतां गंगाजळ ।
कागविष्टेचे झाले पिंपळ । तयांसि निंद्य कोण ह्मणे ?

(६) कन्या देऊनियां कुळ । मग काय विचारावें ?

अमृतराय.

(१) गमन नसे ज्या गांवीं । तेथील वाट कशास पुसावी.

(२) बा तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ.

(३) केलें बेंबीचें उखळ.

(४) भोजनभाऊ केवळ.

(५) नातीं कोरकोरून काढिती । सर्व मायेचा गोंधळ.

निजानंदकवि.

(१) बोलणें फोल झालें । डोलणें वांयां गेलें.

(२) परोपदेशीं पूर्ण ज्ञानी । वोह मत्सर ममता मनीं ।
नागसुरें तो जैसा फणी । डोले परी विष वदनीं.

(३) अन्न ह्मणतां कोण धाले। शब्दें ब्रह्म कोण झाले!
शिकविले बोल बोले। शुक पक्षी पैं जैसा.

(१) नेदी चित्ता शांति ऐसी विद्या काशाला?

(२) मनचा खोटा फिरोनि शिणला तीर्थी काशाला?

(३) एक धडना भाराभर त्या चिंध्या काशाला?

(४) एक गुणी ना दुर्गुणि बेटे शंभर काशाला?

(५) आदर न करी त्याच्या घरचें भोजन काशाला?

(६) अभाग्याचें समर्थाशीं वैर काशाला?

(७) वाया अथवा भेद्या ऐसा सेवक काशाला?

आनंदतनय.

(१) नाना प्रयत्न पुरुषें स्वकरें करावा,
यत्नें फळेल हरिशब्द मनीं धरावा.

(२) भूपाल देव गुरु यांप्रति रिक्त हातें
जाऊं नये.

(३) राजी जया हरि तया न उणेंचि कांहीं.

(४) धीमंत जो करि सुकर्म निजस्वभावें.

(५) ... दुःख मनीं न झांके,
सर्वेंद्रियां शोकसमुद्र फांके.

(६) वरि वरि वचनें लागति गोड। अंतरिं दुर्बुद्धीचा मोड,

अनंत कवि.

(१) मूर्खांसि बोध करितां श्रम होय वाणी.

(२) अभाग्यासि चिंतामणी लाधलासे.

(३) भालपट्ट विधिलेखन नाऽन्यथा.

(४) धेनूसमान तरि वाघ कसा ह्मणावा;
बाळसमान उरगू न कधीं गणावा.
जैं मानिलें परम सज्जन दुर्जनासी
तैं काय तो त्यजिल हो जिविच्या गुणासी ?

अनंतफंदी.

(१) बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडूं नको.

(२) वर्म काढुनी शरमायाला उणें कुणाला बोलुं नको.

(३) बरी खुशामत शहाण्याचीही मूर्खांची ती मैत्रि नको.

(४) सत्कर्मा ओसरूं नको.

(५) सुविचारा कातरूं नको.

(६) परोपकारा शरिर झिजावें जैसा मैलागिरि–चंदन.

रामजोशी.

(१) परिणाम आपुला होइल हा कैसा,
हें ज्यासि कळेना तो नर पशु जैसा.

(२) भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा.

(३) किति उगाळशिल कोळसा.

रघुनाथ पंडित.

(१) कठिण समय येतां कोण कामासि येतो.

(२) मोलें उणें व्यजनही धरितां पुढारीं
छाया करी तपनदीप्तिसही निवारी.

(३) जें कार्य तें धरिल कीं गुण कारणाचें.

(४) गांढ्याळ जो हृदय सार्द्र न होय ज्याचें;
नामेंचि देवनल, कार्य नसे तयाचें.
धत्तूरहि कनकनाम सदां धरीतो,
होईल काय रसिका कनकापरी तो?

कचेश्वर.

(१) ऋषीवाक्य हें सत्य साचार मानीं.

(२) कर्मांची गति नाटळे विधिहरालक्ष्मीपतीलागुनी.

(३) सत्संग होतां तरती दुरात्मे;
सत्संग होतां परब्रह्म आमें;
सत्संग होतां बहु सौख्य आहे;
सत्संग नक्रा फळलाचि आहे.

(४) काळ हे तिन्ही नांदती घरीं.*

(५) दिल्यावांचुनी पाविजे सांग कैसें?

---

* हें सुदाम्याच्या घराचें वर्णन आहे.

धुंडीराज.

(१) कैसीं विघ्नदरिद्रें येती असतां रमेशनाम धन.

(२) भूजल तेज समीर ख रविशशि काष्ठादिकीं हि जो पुरला
स्थिरचर व्यापुनि अवघें जगदात्मा तो दशांगुळें उरला.

शिवदिन केसरी.

(१) जैसें ज्यानें केलें । तैसें त्याला फळ झालें.

(२) प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्यानें केला-तो भला.

शंकर.

(१) शिणली वाणी व्यर्थ चावटी झाली फोलाची,
मनोरथाच्या शेतीं कणसें आलीं पोलाचीं.

विठ्ठल.

(१) असे तुष्ट त्या इंद्र तोषूं शकेना.

बिनांव.

नळी फुंकिली सोनारें। इकडून तिकडे गेलें वारें.



याच ग्रंथकारानें केलेले ग्रंथ.

	कि० रु० आ० पै.
ब्रिटिश राज्यव्यवस्था.	०—८—०
बेकनचे निबंध.	०—८—०
शिसरोक्त नीतिविषयक चार निबंध.	०—४—०
कर्तव्यविचार अथवा व्यवहार नीति. (परत छापणें आहे.)	
इतिहास शास्त्र (")	

चातुर्य आणि मनोरंजन.	०—५—०
सटवाजीराव ढमाले.	०—४—०
पुरून ठेवलेलें द्रव्य	०—४—०

पुस्तकें विविधज्ञानविस्तार पुस्तकालय काळकादेवी रोड मुंबई येथें मिळतील.